इ

['इ-ई' ने प्रारंभ होणारे काही शब्द येथे न आढळल्यास 'वि-वी', 'यु', 'ए-ये'खाली पाहावेत.]

इ. १. मराठी वर्णमालेतील तिसरा वर्ण व स्वरमालेतील तिसरा स्वर. स्थानपरत्वे ऱ्हस्व किंवा दीर्घ : उशिरा, विजा, तिला इ. मध्ये ऱ्हस्व; उशीर, वीज, ती - यात दीर्घ.

इ - ई पु. (तत्त्व.) कामदेवाचे नाव. [सं.]

इ उपसर्ग. स्थानाचा नजिकपणा दाखवण्याकडे उपयोग. उदा. इ-कडे, इ-थे, इ- तका इ.

इ प्र. चा, ची, चे षष्ठीचा फारसी प्रत्यय: 'श्री कारवे व कोडिवले व वडिगाऊं राजमुद्रा मुख्य समस्त इ असिर्वादु'- शके १४२९ मधील एक पत्र. यातील समस्त इ = चे समस्त' - भाद्विसंवृ १५.[फा.]

इउती वि. क्रिवि. या बाजूला 'यासि एकु सेवटु इउती'- लीचपू ३०८.

इउलाला-ली-ले वि. एवढासा; लहान : 'भगतुजनीं इउलालीं तोंडें केलीं असेति.'- गोप्र ५८.

इकटीक करणे सक्रि. (जिन्नस वगैरे) विकणे : 'मी काही इकटीक करीन. पैसे ठेवणार नाही.'- गांधारी ८२.

इकडचा-ला, इकडील वि. या ठिकाणचा, बाजूचा, दिशेचा, रस्त्याचा, इकडे असणारा. (वा.) **इकडचा डोंगर तिकडे करणे, इकडला गड तिकडे नेऊन ठेवणे-** मोठे अचाट, अवघड काम करणे. **इकडला लुच्चा तिकडला चोर -** दोन्हींकडून थपडा खाणारा. (व.)

इकडचातिकडचा वि. या बाजूचा आणि त्या बाजूचा; विषयांचा; कोठला तरी; चार (अनेक) ठिकाणचा.

इकडून क्रिवि. येथून; या दिशेहून-ठिकाणाहून-बाजूकडून (ग्रा. रूप) इकडने. पहा: **इकडे**

इकडूनतिकडून क्रिवि. येथूनतेथून; आजूबाजूंनी; कोठूनतरी; कसेतरी.

इकडे पु. (स्त्रियांचा शब्द) पती; नवरा; जुन्या काळात नवऱ्याचे नाव न घेण्याच्या पद्धतीमुळे वापरात सर्वनामासारखा शब्द : 'काय मेल्यांची छाती लागली आहे इकडच्या पुढें उभें राहण्याची'- पृच १३७.

इकडे-स क्रिवि. १. या बाजूस, दिशेस. २. येथे; या जागी. ३. स्थानी, कडे या अर्थी. पहा : **एथे** [हा + कडे; का. ईकडे; ते. इक्कड.]

इकडेतिकडे क्रिवि. येथे तेथे; या बाजूस त्या बाजूस; आसपास; सगळीकडे.

स्त्री. (ल.) टंगळमंगळ; कुचराई; लपंडाव (क्रि. करणे, मांडणे).

इकरम पु. देणगी; दया; कृपा. [अर. अक्रम]

इकरा वि. अकरा. अकरा चा अप. (गो.)

इकराम पु. कृपा; मेहरबानी; मानसन्मान: 'पथकी पण हकदक मानपान इक्राम कानू कायदेसुद्धां सुदामत चालत आल्याप्रमाणे.'- बाबारो २.६४. [फा. इक्राम]

इकरार पु. १. कबुली; करार; ठराव. २. लेखी किंवा तोंडी जबानी : 'पर जिल्ह्यांतील साक्षीचा इकरार घेऊन पाठविणेंविषयीं जडजानें जडजास लिहावें'- न्यासे ३४. [अर. इक्रार]

इकरारनामा पु. लेखी ठराव; कबुली, कबुलायत. [फा.]

इकलजमकी स्त्री. पाठपुरावा: 'तुझे कितेक मशाकती व इकलजमकी व मसालती केली...'- शिवप्र ८४. [अर.]

इकला वि. अकरा. भाजीपाल्याचा सौदा करताना व्यापारी असे सांकेतिक शब्द वापरतात.

इकळणे क्रि. किळस येणे; शिसारी येणे :'मास्तर, त्याची दारू अशी नाही सुटणार. तुम्ही घोड्याचे मूत कशातून तरी पाजा. चांगल्या उलट्या व्हतील; दारूला इकळूनच जाईल तो.' - हीवांमा ४७. (कुण.)

इकळत स्त्री. काकुळत; दया. [सं. विकल]

इकळी स्त्री. कुर्ली; खेकड्याच्या जातीचा एक प्राणी; हिच्या आकड्याचा वरचा भाग बराच मोठा व लांब असतो.

इकळी-ळूत स्त्री. किळस; कळमळ; ओकारी; शिसारी (क्रि. येणे). (कुण.)

इकामत स्त्री. राहणे; थांबणे. [फा.]

इकून तिकून पहा : **इकडून तिकडून**

इक्तिरान जवळ

इक्तीदार पु. १. अनुयायी; अनुकरण करणारा. २.(ल.) विश्वासू. [फा. इक्तिदा]

इक्बाल पु. अभ्युदय; भरभराट; सुख; नशीब; सुदैव. [फा.]

इक्राम पु. मेहरबानी; पारितोषिक; इनाम; इज्जत; आदर. [फा.]

इख न. विष; जहर; विख: 'संभा पाटील म्हणजे गावातलं इख होतं.'- पंवा १०२. (ग्रा.)[सं. विष]

इखण न. हत्यार; अवजार; साधन; उपकरण.

इखरा पु. एक काटेरी झाड. याला बारीक निळी फुले येतात : 'पाणथळीतून लव्ही व इखरा... गर्दी करत होते.'- आआशे २७१.

इखलास पु. मैत्री; विश्वास; स्नेह; प्रीती; अंत:शुद्धी; मनाचा निर्मळपणा; निष्कपटीपणा. [फा. इख्लास]

इखलासनामा पु. स्नेहाचे पत्र; मैत्रीचे पत्र; स्नेह्यासोबत्यांनी एकमेकांस पाठविलेले पत्र. [फा.]

इखलासी वि. स्नेहपूर्ण; प्रेमळ; चाहता; प्रेमाचा. [फा.]

इखळा पु. (सुतारी व्यवसाय) खिळे वगैरे उपटण्याचा चिमटा.

इखंन्पाखंन् न. शेतकीचे हत्यार वगैरे : 'शेत वाहतो म्हणतोस कांही इखंनपाखंन् आहे का?' [इखणचे द्वि.]

इखीत वि. ईषत; किंचित; थोडेसे : 'गोसावी इखीत हास्य केलें.'- लीचउ ३.१६. [सं. ईषत्]

इखीति क्रिवि. यत्किंचित. (ग्रा.) [सं. इयत्तक]

इख्तियार पु. १. स्वीकार. २. सामर्थ्य; अधिकार.[फा.]

इख्तियारनामा पु. मुखत्यार पत्र; वकीलपत्र.

इगडी वि. विद्रूप; कुरूप: 'इगडी तिची सासू मग उठली जेवाया.'- जसा २७९.

इगत, इगुत, इगूत स्त्री. युक्ती; उपाय. [युक्ति अप.]

इगरणे क्रि. (कपडा झिजल्यामुळे) विरणे; विरविरीत होणे : 'आताच तर इगराया लागलेत आन् सक्राती पसवर कसं तग धरतेल गं ?'– वाळवण ८८.

इगर्ज, इग्रज स्त्री. ख्रिस्ती कॅथॉलिक पंथीयांचे देऊळ.(गो.) [पोर्तु.]

इगीन न. संकट; विघ्न; अडचण : 'लक्ष्मण दिरा, सांग मनीचं रे इगीन'– जसा २९२.

इगुड क्रिवि. बिघड; बिघाड :'धडाचा इगुड करशील । आन् सगळं बिघडवून टाकशील.'– आपा ७०.

इगूत स्त्री. युक्ती : 'हंबा हंबा करूनी धराव तिजला । ये इगूत नामी मजला ।'– घुले गुराखी. (ग्रा.)[सं. युक्ति]

इग्यारावी वि. अकरावी : 'गोठ इग्यारावी.' (भिल्ली)

इग्लाई स्त्री. अधाशीपणा : 'खाऊली वीखत । इग्लाई केवों नेत्र.' – भिल्ली भाषा २५. (भिल्ली.)

इग्लू स्त्री. (समाज.) ध्रुव-प्रदेशात राहणाऱ्या एस्किमोची बर्फापासून बनवलेली झोपडी; हिमकुटी.

इग्वा फूस.

इघड पु. बिघाड. (कु.)

इघीन न. विघ्न; संकट : 'रामाची आणली सीता इघीन आलं घरा.'– जसा ३१०.

इचकणी पिचकणी करणे क्रि. चेष्टा करणे : 'बायकोला मारणारा घोव म्हणून आमची इचकणी पिचकणी करीत.' – तोरण १५४.

इचकणे क्रि. बिघडणे; मोडणे : 'काबा (मिसन) इचकली का ?'– धग १९.

इचका पु. १. तृण धान्यातील एक प्रकारचे गवत व त्याचे बी. २. एक झुडूप. याची पाने खाण्यायोग्य असतात. पहा: **विचका**

इचका पु. एक प्रकारची गोफण.

इचकाइंधन वि. अव्यवस्थित; मोडतोड झालेले. (व.)

इचकी स्त्री. महामारी. (व.) [सं. विषूचिका]

इचना पु. फक्त पावसाळी दिवसांत सापडणारा लहान मासा. याला पुण्याकडे इचका किंवा इचकी म्हणतात. याच्या छातीपोटावर दोन व पाठीवर एक असे पंख असून अंगावर अनेक रंगी ठिपके असतात.

इचर वि. विरळ. (व.)[सं. विचर]

इचरकुंधा विरळ झालेला कुंधा (एक प्रकारचे गवत).

इचंगना स्त्री. परीक्षा; विचक्षणा :'त्येकरता तुजी इचंगना नगं.'– पडरे ३६९.

इचीभन उद्गा. मूळ वापर शिवीसारखा; आश्चर्य किंवा हेटाळणी दाखवण्यासाठी उपयोग करतात : 'इचीभन, हाथं समदा मान आबांनाच !'– बाय २.२.

इच्चक इच्चकदागो वि. खोडकर; खट्याळ, इब्लिस. (व.)

इच्चकपना पु. खोडसाळपणा : 'तुनं काइ इच्चकपना केला अस्सीन.'– धग १४६. (व.)

इच्छा स्त्री. १. वासना; वांछा; आशा; आकांक्षा; मनोगत; मनीषा; आवड. सामा. शब्द – इच्छापूर्वक; इच्छापुरःसर इ. २. (ग.) इच्छांक; त्रैराशिकातील प्रमाणसजातीय राशी. आद्यांक, मध्यांक व अंत्यांक किंवा इच्छांक ही तीन पदे असतातच. चवथे इच्छाफल (उत्तर) काढावयाचे असते. उदा. पाच रुपयांस दोन मण, तेव्हा चार रुपयास किती ? येथे पाच हे 'प्रमाण' व चार ही 'इच्छा' [सं. इष्]

इच्छातीत स्नायू पु. (प्राणि.) अनैच्छिक स्नायू. पहा : **इच्छानधीन**

इच्छातृप्त क्रिवि. इच्छेची तृप्ती होईपर्यंत.

वि. ज्याच्या इच्छेची पूर्ती झाली आहे असा.

इच्छातृप्ति–प्ती मनीषा सिद्धीस जाणे; हेतू सफल होणे.

इच्छादान न. इच्छिलेले दान देणे; इच्छा पुरी करणे.

इच्छादानी वि. इच्छादान करणारा; ज्याची जी इच्छा असेल ती पुरवणारा : 'तुका म्हणे इच्छादानी । पुरवी आवडीची धनी ।'

इच्छाधीन वि. इच्छेप्रमाणे चालणारा; इच्छेस येईल तसे करणारा : 'इच्छाधीन जे स्नायू आहेत म्हणजे जे स्नायू मनात आल्याबरोबर आपल्या शरीराचे अवयवांचे ठिकाणीं ... गति उत्पन्न करितात.' –मराठी ६ वे पुस्तक (१८७५) २६०. [सं. इच्छा+अनधीन]

इच्छानधीन वि. इच्छेबाहेरचा; इच्छेच्या ताब्यात नसलेला. स्वतंत्र 'रक्ताक्षय हा एक इच्छानधीन स्नायूच आहे.'–मराठी ६ वे पुस्तक (१८७५) – २६०. [सं. इच्छा+अधीन]

इच्छापुरचे तालुकदार श्रीमंतीत आळसात वेळ घालविणारे व स्वेच्छेप्रमाणे वागणारे ऐदी लोक : 'गंगामाइची कृपा व सपाट सुपीक भूमी आमचेकडे असती तर कदाचित आम्ही इच्छापुरचे तालुकदार बनून फुलांचे गजरे घालून हिंडलों असतो.'

इच्छापूर्ति–र्ती न. इच्छेची फलद्रूपता, पूर्तता; इच्छातृप्ती.

इच्छाफल स्त्री. त्रैराशिकातील चौथे पद (उत्तर) मध्यपद आणि इच्छांक यांचा गुणाकार करून त्यास आदिपदाने भागले असता इच्छाफल येते. [सं.]

इच्छाभंग पु. इच्छा पूर्ण न होणे; आशा निष्फळ होणे; निराशा पदरी येणे. [सं.]

इच्छाभोजन न. १. तृप्ती होईपर्यंत जेवणे. २. भरपूर जेवण. ३. आवडीचे, इच्छित पदार्थ खाऊ घालणे. [सं.]

इच्छामरण न. इच्छेस येईल तेव्हा मरण येणे, मरणे; स्वतःला हवे तेव्हा नैसर्गिकपणे मरण्याचे सामर्थ्य, शक्ती. [सं.]

इच्छामरणी–मृत्यू वि. मरण स्वतःच्या स्वाधीन असलेला; इच्छा होईल तेव्हा मृत्यूस निमंत्रण करणारा; इच्छामरणाचा ईश्वरी प्रसाद असणारा: 'ख्यातयशस्वी इच्छामृत्यू तुम्ही कुरुकुळांत वासवसे ।'– मोउद्योग ११.८७.

इच्छार्थक वि. इच्छा दाखवणारे, इच्छादर्शक. [सं.]

इच्छालाभ पु. इच्छित वस्तू मिळणे, प्राप्त होणे. [सं.]

इच्छावसें क्रिवि. इच्छेप्रमाणे.

इच्छावान् वि. इच्छा असणारा; इच्छायुक्त . [सं.]

इच्छाविनाश पु. १. कामनाक्षय; इच्छाभंग. २. इच्छादमन; आत्मसंयम. [सं.]

इच्छाविलास–विहार पु. मन मानेल तेव्हा, मन मानेल तसे खेळणे; मनसोक्त विलास, चैन करणे. [सं.]

इच्छाशक्ति–क्ती स्त्री. इच्छेचे सामर्थ्य; संकल्पशक्ती; इच्छा कृतीत उतरविण्याची मनाची शक्ती. पहा : **ईहा** [सं.]

इच्छासिद्ध वि. आपल्या इच्छेप्रमाणे सिद्ध किंवा असिद्ध ठरवता येण्यासारखा. [सं.]

इच्छास्वातंत्र्य न. (राज्य.) अनुचित बंधनापासून मुक्त असलेली इच्छा; कोणत्याही मर्यादा न ठेवता इच्छा किंवा निवड करण्याचे स्वातंत्र्य; प्रवृत्तिस्वातंत्र्य. [सं.]

इच्छाक्षय पहा : **इच्छाविनाश**

इच्छांक पु. (ग.) पहा : **इच्छा** २

इच्छिक, इच्छुक, इच्छु–च्छू वि. इच्छा असणारा; आकांक्षी : 'पूर्वील सोयरा लग्नाचा इच्छिक ।' – व ५. [सं. इच्छक]

इच्छिणे सक्रि. इच्छा करणे, धरणे; आकांक्षा असणे; चिंतणे; वांच्छिणे; हेतू, मनीषा असणे; लोभ धरणे. [सं. इष्]

इच्छित वि. इच्छिलेले, चिंतिलेले; वांच्छिलेले. [सं.]

इच्छुक वि. १. इच्छा असणारा; अपेक्षा बाळगणारा; हेतू असणारा. २. निवडणुकीतील उमेदवार किंवा उमेदवारी मिळवू इच्छिणारा.

इच्छुक बोलीदार पु. लिलावात बोली बोलण्याची आकांक्षा असलेला.

इजगो स्त्री. चिकित्सा; विचका. हा शब्द द्विरुक्तीने वापरतात : 'याला दाखीव त्याला दाखीव असी इजगो इजगो चाली.' (व.)

इजट न. ऊद मांजर; कांडेचोर; गूळ खाणारे मांजर. (माण. इजाट.)[का.]

इजन पु. सैनिक.

इजबळ स्त्री. पालीची एक जात. (व.)

इजमायली वि. तकलुपी, बळकट नसलेला:'... मागे मेढा घातला होता तो इजमाइलीच होता.'– पेद २२.१६७.२. कच्चा, जुजबी (हिशेब, गावचा ताळेबंद). ३. कामचलाऊ; हंगामी; कच्चे; तात्पुरते. (इमारत, काम वगैरे.) (कों.)[फा.]

इजलास स्त्री. बैठक; सभा; अधिवेशन; (न्याय) सत्र. [अर. इज्लास.]

इजहार क्रिवि. परिस्फुट; उघड; जाहीर; प्रसिद्ध : 'किले याचा मजकूर सविस्तर आज्ञापत्राप्रमाणे खलबतामध्ये नवाबाचे खजमतेस इजहार केला.'– पेद २८.२२. [फा.]

इजा स्त्री. १. अपाय; पीडा; वास; उपद्रव; दुःख : 'तालुकियास इजा न लागे ऐसा वंदागस्त होऊन तेजवंतास पत्रें यावीं.'– मइसा ७.११७. २. आघात; जखम. [फा.]

इजाजत स्त्री. अनुमती; परवानगी : 'त्यांना आपल्याला भेटायची इजाजत दिली आहे.'– श्रीयोभा १.४९०. [फा.]

इजाट न. ऊद मांजर : 'एक विचित्र, काळे, केसाळ जनावर गावात आल्याची बोलवा होती. कुणी ते इजाट असल्याचे म्हणे.'– सोपिं ५६.

इजाफत स्त्री. (इनामदारास) वतनास कायम जोडून दिलेले गाव; इजाफत इनाम. २. इतर राजांकडून किंवा परराष्ट्रांकडून येणाऱ्या देणग्या किंवा नजराणे यांचा हिशेब ठेवणारे खाते; इजाफतखाना; हा जो खर्च होतो त्यास इजाफत खर्च म्हणतात. ३. वाढ; बढती.
वि. अधिक; जादा; जास्त. [फा. इझाफा]

इजाफत जमा स्त्री. १. रयतेवरील कराव्यतिरिक्त इतर साधनांनी (कर्ज, नजराणे, नाणेचढाव इ.) सरकारने गोळा केलेला जादा पैसा. २. एका महालात किंवा सुभ्यात दुसऱ्या महालाचा जमा झालेला जादा वसूल. ३. जप्त केलेल्या एखाद्या गावचा वसूल.

इजाफती वि. कर, वसुली संबंधी.

इजाफह, इजाफा पु. १. गावइनाम; नेमणूक; तनखा; नजराणा. २. वाढ; बढती; आधिक्य : 'इजाफा पंचहजारीचा देणार.'– मइसा १.१७९.

इजाविजा क्रिवि. लागोपाठ दोन वेळा.

इजा बिजा तिजा अ. १.एका मागून एक असे तीन वेळा; दोनदा झाले की तिसऱ्यांदा होतेच अशा कल्पनेने तिसऱ्या वेळी वापरतात. (क्रि. होणे, सांगणे).२. (ल.) वारंवार; कैक वेळा.

इजायली, इंजायली वि. १. अगदी सामान्य, जंगली, रायवळ इमारती लाकूड; सागाखेरीज इतर लाकडाला म्हणतात. २. अशा लाकडाचे बांधकाम. [फा. अजाल= हलके]

इजार स्त्री. विजार; पायजमा, सुर्वार; चोळणा; पाटलोण : 'इजारा पैजारा मुक्तलग सकळा ।' – सप्र ७.११.

इजारत, इजारा स्त्री. पु. १. खंड; मक्तेदारी; विशिष्ट करार; भाडेपट्टा; चढलावणी (एखादे खेडे किंवा ओसाड जमीन ३०–४० वर्षात वसाहत करण्याच्या किंवा लागवडीस आणण्याच्या कराराने देणे); धारा : 'शेरीफाकडे शायरचा इजारा असे, आणि त्यांस दरवर्षी त्याजबद्दल ठरावीक रक्कम सरकारात भरावी लागत असे.' – इंमू ५४. २. (ल.) जबाबदारी :'सर्व इजारत मन्सब्याची तुझ्यावर आहे.'– चित्रगुप्त ९२. [फा.]

इजारदार पु. इजारा देणारा; मक्तेदार; ठेकेदार; कंत्राटदार : 'त्या वेळेस इतर इजारदारांप्रमाणे त्यांच्याकडेस कांहीं सरकारी बाकी होती.'– विक्षिप्त १.५०. [फा.]

इजारदारी स्त्री. मक्तेदारी.

इजारपट–पट्टा पु. १. इजारदाराची सनद. २. गावातील किंवा विशिष्ट हद्दीतील शेतांची जंत्री, फेरिस्त. ३. गावच्या मुख्य पाटलाला सरकारतर्फे दिलेला वार्षिक वसुलाचा हिशेब, जमाखर्च. यात गावावर बसवलेला वसूल व त्याची फेड कशी करावी यासंबंधी माहिती असे. ४. गावचा ठराव होऊन पाटलास दिलेला कागद. [फा. इजारा + पट्टा]

इजारी वि. गुडघ्यापर्यंत पाय पांढरे असणारी (मेंढी वगैरे). [फा. इझार]

इजितखत न. अजितपत्र पहा: **यजितखत** : 'त्यांनीं आपलें खुषरजावंदीने तुम्हांस इजितखत लिहून दिले.'– शारो १.१५७.

इजूक लागणे क्रि. दुखणे लागणे.

इज्आन पालन.

इज्जत, इजत स्त्री. १. अब्रू; प्रतिष्ठा; मान; थोरवी; कीर्ती. २. पत्राच्या आरंभीचा बहुमानार्थी मायना.[फा. इज्जत्] [वा.] **इज़्ज़त खाणे** – पहा : **इज्जत घेणे, इज्जत खोवणे** – अब्रू, प्रतिष्ठा किंवा थोरवी सांभाळण्याची ईर्षा धरणे : '.... आपल्याहातें सरदारीची इजत खोविली.' – पेद २७.१२६. **इज्जत घेणे** –बेअब्रू करणे; विनयभंग करणे; अतिप्रसंग करणे. २. दुर्लौकिक करणे.

इज्जत आसार वि. सुप्रतिष्ठित; सन्मान्य; नामदार. फारशी पत्रातून नावाच्यापूर्वी हा बहुमानवाचक शब्द किंवा पदवी.

इज्जत खाऊ, घेणा वि. १. एखाद्याची अब्रू किंवा मान कमी करणारा; बुडविणारा; आश्रयदात्याची बेअब्रू करणारा. (नोकर, वस्त्र, घोडा इ.) २. घोटाळा माजविणारा; कार्यनाश करणारा; मूर्खपणा पदरी बांधणारा; अब्रू घालवण्यासारखा.

इज्जतदार वि. प्रतिष्ठित; मातब्बर; अब्रू असणारा. [फा.]

इज्जतपन्हा–महा वि. सुप्रतिष्ठित; श्रेष्ठ; नामदार (एक पदवी) [फा.]

इज्जतलायक क्रिवि. प्रतिष्ठेप्रमाणे; मानमरातबाप्रमाणे : 'सिरुपाऊ इनामत देतात ते अवघ्या सर्दारांसहि इज्जत लायख घेणें. –मइसा ६.२१०.

इज्जत हुर्मती स्त्री. मानपान : 'पेशजी यांच्या वडिलांची इज्जत हुर्मती चालली आहे तैसी चालविणे.' – वाडसनदा १६.

इज्जती, इजती, इज्जतीचा वि. अब्रूदार; प्रतिष्ठित; सन्मान्य.

इज्जती दस्तगाह वि. प्रतिष्ठा–निधी; श्रेष्ठ; सन्मान्य. [फा.इझात्+दस्तगाह]

इज्ना पु. ताबा; सत्ता : 'जो कोणी सवाईसिंगाचे इज्न्यांत येईल त्यास राज्य द्यावें' – जोरा १०७. [फा. इझ्न = परवानगी]

इज्नात क्रिवि. आधीन; लगामी.

इज्हार पु. जाहीरनामा; प्रसिद्धीकरण; ताकीदपत्र; नोटीस; समन्स. [फा. इझ्हार]

इट स्त्री.वीट. [क. इ ट्टिगे सं. इष्टिका]

इटकुली–मिटकुली वि. लहानशी; एवढीशी : 'इटकुली मिटकुली गोष्ट सरो तुमचें आमचें पोट भरो.' [सं. इयत्कल]

इटकोर वि. अटकर; हट्टी; अडेल. (व.) [अटकरचा अप.]

इटा पु. भाल्यासारखे एक शस्त्र; वीट; सांग. या भाल्याची लांबी सहा फूट असून पुन्हा त्याच्या शेवटास सहा फूट लांबीची दोरी बांधलेली असते. ती मनगटाला बांधून इटा फेकतात. म्हणजे याचा मारा बारा फुटांपर्यंत चालतो. पट्ट्यापेक्षाही हा मारा जास्त असल्यामुळे 'दहा पट्टेकरी तर एक इटेकरी' अशी म्हण पडली आहे. [सं.यष्टि]

इटावप्रत पु. रुपयाचा एक प्रकार : 'उदमी येतील जिन्नस विकतील त्याचा रुपया घेणे देणे तो इटावप्रत दौलताबादप्रत घ्यावा द्यावा.' – पुदभा ३.१०३

इटाळ–णे–सी पु. १. पहा. **विटाळ** २. धोंडमार : ' जें निंदेचें इटाळवें– हीं ।' – राज्ञा १८.५४७.

इटाळा पु. विटेचा तुकडा : 'वरि पडतातिे इटाळे' – उषा ६०२.

इटाळी स्त्री. आळ; आरोप; किटाळ: 'ऐकें गे यशोदे जननी अवघी लटकीच याची करणी । आम्हांवरी इटाळी घेऊनी । नसतीच उठतो गे ।' – हरि ७.२५७. [किटाळ, विटाळ चा अप.]

इटाळे न. मातीच्या विटा पाडण्याचा लाकडी साचा : 'मग भुईचें इटाळ घेऊनि कोपें भूमीसीं आफळिलें' – लीच २.१८.

इटिजन वात पु. (भू.) पूर्व भूमध्य सागरी प्रदेशात उन्हाळ्यात उत्तरेकडून वायव्य दिशेकडे वाहाणारे तीव्र वेगवान वारे.

इटीमिटी–ठी स्त्री. १. धार्मिक नित्यकर्म : 'आपुली इटीमिटी सारूनि या' –लीचपू ५७१. २. दृष्ट लागू नये म्हणून ओवाळून टाकतात ती वस्तू. (पायाची माती ओवाळतात किंवा ती कपाळाला लावतात, किंवा मीठ मिरच्या ओवाळून टाकतात.); अलायबलाय; इडापिडा; निंबलोण : 'झणीं लागेल बाह्यदृष्टी म्हणोनी घेतली इटिमिठी । निंबलोण उठाउठी । करीं गोरटी निजभावें ।। – एरुस्व १४.९१.

इटेकरी, इटेबरदार पु. इटा हत्यार धारण करणारा, बाळगणारा शिपाई.

इटोला पु. तीन विटांची चूल. [सं. इष्टक]

इठाळ स्त्री. १. फोडणी देताना ती स्वादिष्ट व्हावी म्हणून वापरायची एक दगडी वाटी, २. चपटा दगड किंवा विटेचा तुकडा.

इड स्त्री. १. एक भूषण; अलंकार; तोरण: 'कीं आकाशीं इड बांधली; कापूर केळीची ।' –शिव ३३३. २. शिडी[का. एणि, सं. ऋद्धि]

इडकणे, इडकावणे अक्रि. १. नखरे करणे; चेष्टा करणे: 'असा इडकाऊं नकोस.' २. नटणे मुरडणे ३. लाडात येणे.

इडगळला वि. घाणेरडा, ओंगळ; ओबडधोबड (व.)

इडगंड न. गुप्त धन. (बे.) [का. इडुगंट]

इडनिंबू–लिंबू पहा : **ईडनिंबू**

इडपाड पु. नेट; आवेश; जोर; श्रम : 'भाले त्रिशूळ इडपाडें । घे घे म्हणोनिं टाकिती ।।' – मुआदि १२२. [सं.ईर्षा.]

इडरी, इडली स्त्री. तांदूळ व उडीद डाळ विशिष्ट प्रमाणात घेऊन १२ तास भिजवून वाटतात. पुन्हा १२ तास भिजवून (आंबवून) इडलीपात्रात उकडतात तो पदार्थ : [का. इड्डली]

इडळणे अक्रि. फळ पिकून नासू लागणे; उतरणे.

इडा स्त्री. नाभिचक्रापासून निघून डाव्या नाकपुडीतून वाहणारी एक नाडी. ही योग व स्वरशास्त्र यांत प्रसिद्ध आहे. हिला चंद्रनाडी म्हणतात. पिंगला व सुषुम्ना ह्यांच्याबरोबर इडेचा उल्लेख येतो : 'इडोनि करावा प्राण पूर्ण.' – एभा १४.४२०. [सं.]

इडापिडा स्त्री. (बायकी) सर्व त्रास; संकटे; अरिष्टे; दुःखे. (ओवाळताना किंवा दृष्ट काढताना बायका म्हणतात.) (क्रि. जाणे, टळणे, नाहीशी होणे, दूर होणे.) [पीडाचे द्वि.]

इडाळणे क्रि. १. अधिक पिकणे; उतरणे; 'त्यातच विटलेली, इडाळलेली पेरू केळी मांडले होते.' – हात १४. २. सुकणे; डागाळणे : 'उन्हांत पडलेला ऊस तापून आतील रस इडाळतो' – गार १३२.

इडूरी स्त्री. एक पक्वान्न : 'पूर्ण परिपूर्ण पुरिया । सबाह्य गोड गुळवरिया ।

क्षीरसागरींच्या क्षीरघारिया । इडूरिया सकुमारा ।' – एरुस्व १४.११९.

इडेपाडे क्रिवि. १. आवेशाने; इर्षेने. २. श्रमाने; कष्टाने : 'भाले त्रिशुळ इडें पाडें । घे घे म्हणोनि टाकिती ।' – मुआदि ६.३९. [सं.ईर्षा]

इणंग फार काटे असलेला एक लहान मासा. (गो.)

इत अ. युक्तार्थक प्रत्यय : आनंद–आनंदित, संपादित, सुधारित इ.

इतउत्तर क्रिवि. यानंतर; इतःपर.

इतउपर यापुढे; आतापासून, येथून पुढे. [सं. इतः + उपरि]

इतकाला वि. १. एवढा; एवढा मोठा (परिणाम, संख्या, माप इ. दाखवणारा शब्द). 'दर एका जिनसाला इतकाली किंमत द्यावी लागली.' – मराठी सहावे पुस्तक (१८७४) १९२. [सं. इयत्]

इतकावा वि. एखाद्या मालिकेतील किंवा आवृत्तीतील अमुकएवढ्या प्रमाणाचा, मर्यादेचा, पायरीचा, अवस्थेचा.

इतपत वि. एवढे; या प्रमाणात; इतके. [सं. इयत्परिमित]

इतफाक पु. सहविचार; एकविचार; सल्लामसलत : 'याचा बंदोबस्त कळेल तसा आम्ही राजश्री पंतप्रधान याचे इतफाकानें करूं.' – मइसा १.२६१.

इतबार, इदबार पु. १. विश्वास; इमान; श्रद्धा : 'भरवसा आतां इतबार कोणाचा येत नाहीं.' – सभासद २९. २. प्रतिष्ठा; पत; मानपान : 'कोणा इतबार याचा घरीं'–सला११. [अर. एअतिबार]

इतबारपण श्रद्धाळूपणा; विश्वास; भरवसा; खात्री.

इतबारी वि. विश्वासू; प्रामाणिक; भरवशाचा : 'म्हणें तुम्ही धन्याच्या बऱ्यावरी पहिल्यापासूनि आहांत इतबारी ।' – अफला १५.

इतमाम पु. १. लवाजमा; थाटमाट; खटला; (दासदासी, पालखी, घोडा इ.) सरंजाम. २. दर्जाप्रमाणे खाजगी किंवा सरकारी तैनात : 'इतमाम ज्याचा त्याला । मराठे मुसलमानांला ।' – ऐपो २३२. [फा. इह्‌तिमाम्=व्यवस्था, बंदोबस्त]

इतमामी वि. इतमाम ठेवणारा, असणारा; सरंजामी; लवाजमेवाला.

इतमाम्या पु. व्यवस्थापक; रखवालदार; नोकर; 'बाणकरी व इतमामे पुण्यास रखवालीस पाठविले.' – ऐलेख १.४३३.[फा. इह्‌तिमाम्]

इतर वि. सना. १. अन्य; निराळा; येर; दुसरा वेगळा. २. उरलेला; याशिवायचा; बाकीचा.[सं.] (वा.) **इतर पितर काढणे–** नातलगांवरून शिव्या देणे; मायबहीण उद्धरणे (व.)[पितरचे द्वि.]

इतरणे अक्रि. १. खोड्या, चेष्टा, चाळे, नखरे करणे; उनाडणे 'अरे! असा इतरतोस काय?' २. अवांतर गोष्टी करणे; सांगणे; विषयांतर करणें. (व.)[सं. इतर]

इतरत्र क्रिवि. अन्यत्र; इतर ठिकाणी; दुसरीकडे. [सं.]

इतरथा क्रिवि. १. दुसऱ्या प्रकारे; निराळ्या रीतीने; अन्यथा : 'नसता दासजित प्रभु, करितां सारथ्य कां इतरथा तें ।' – मोभीष्म ४.२०. २. उलटपक्षी : 'कांची शोभे वदुं इतरथा भूषणें दूषणें हीं ।' – कमं २.२९ [सं.]

इतर विशेष वि. उरलेले; राहिलेले; अवशिष्ट; किरकोळ. (बाबी गोष्टी).

इतराज वि. अप्रसन्न; रुष्ट; नाराजः 'न जावें तरी खावंद इतराज होतात.' – पात्रप १३८. [फा. इअतिराझ]

इतराजी स्त्री. अप्रसन्नता; गैरमर्जी; अवकृपा; नाराजी.[फा. इअतिराजी]

इतरायेल वि. वात्रट; चावट. (खा.)

इतरेजन पु. काही नात्याचा संबंध नसलेले; परके; काही हितसंबंध नसलेले : 'म्हणून इतरेजन काहीं तरी त्यांत दोष काढीत राह्यचेच' – विवि २७०. [सं. इतरे+जनाः]

इतरेतर सना. वि. परस्पर; अन्योन्य; एकमेक.
पु. (व्या.) द्वंद्व समासातील एक भेद – ज्या समासाचा विग्रह 'आणि' किंवा 'व' या उभयान्वयी अव्ययांनी केला जातो असा समास. उदा. हरिहर, आईबाप इ. [सं.]

इतरेतरशून्यता स्त्री. (तत्त्व) अन्योन्यशून्यता; परस्परशून्यता. [सं.]

इतरेतराश्रयत्व (तत्त्व) १. परस्परावलंबित्व २. अन्योन्याश्रयत्व. [सं.]

इतलतितल वि. चंचल; धरसोड वृत्तीचा; लहरी
क्रिवि. लहरीपणाने; धरसोडीने; चंचलपणे. (क्रि. करणे, बोलणे, चालणे, लावणे, मांडणे). (गो.)

इतलसार पु. घोड्याच्या अंगावरील एक वाईट भोवरा; हा कुल्ल्यावर असतो. ही एक घोड्याची खोड मानतात.

इतलाक–की १. स्वतंत्र; निराळा; मोकळा. २. पगारी (कायमची नेमणूक नसलेला तात्पुरता नोकर किंवा फौजेतील शिपाई या संबंधाने वापरतात. इतलाखी फौज. नोकर वगैरे) : 'सात हजार फौज इत्लाख रोजमऱ्यावर ठेवावी.' –ऐलेख ८.४३२२. [फा. इतलाक]

इतलाक फौज स्त्री. कारणपरत्वे भरती केलेली अधिक फौज : 'या खेरीज इतलाक फौज दाहा हजारापासून पंचवीस हजारापर्यंत वाढविली जात असे.' – विंचूह ९१.

इतलाख वि. रोख : 'श्रीमंतांनीं गंगातीरास राहून इतलाख खर्चास द्यावें. येणें प्रमाणें ठराव झाला तरी उत्तम.' – ऐलेसं २६५८.

इतलाख, इतलाख नेमणूक स्त्री. सरकारी तिजोरीतून किंवा कोठारातून मिळालेली ठरावीक नेमणूक; इनाम : 'पांचशे रुपयांचा गांव व पांचशे रुपये इत्लाख.' – वाडसमा १.३६.

इतलाखी स्त्री. स्वातंत्र्य : 'रियासतींत मोठी गोष्ट कीं वचनाची कायमी, त्यांत तलवून मिजाजी (लहरीपणा) झाल्यास व इतलाखी बातल होऊं लागल्यास लाचार.' – ख ७.५७४. [फा. इत्लाक्]

इतल्ला पु. स्त्री. १. संबंध; हित; मतलब; लक्ष; गुंता; लोभ : 'हरतऱ्हा करोन त्याचे (शिंद्याचें) परिघांतून आपले पेठेंत येऊन राहिलों, त्यांचा इतल्ला आम्हांकडे नाहीं.' – ऐलेख १०.५६०६. २. वार्ता; खबर; बातमी (विशेषतः सरकारास दिलेली). (क्रि. करणे, देणे, सांगणे, लिहिणे) : 'त्याचा इतल्ला पाटीलबावास केलाच असेल.'– मदरू ३.६५. [फा. इत्तिला.]

इतल्लेपत्रक न. सरकारी बातमीदाराचा लेखी अहवाल; वार्तापत्र. (सामा.) बातमीपत्र; अहवाल.

इतवा वि. पहा : **इतका, इतकावा**

इतवार पु. आदितवार; रविवार. [हिं.]

इतस्ततःक्रिवि. इकडेतिकडे; इकडून तिकडून; अस्ताव्यस्त; अनिश्चितपणे. [सं.]

इतःपर क्रिवि. यापुढे; यानंतर; इतउत्तर; अतःपर. [सं.]

इताअत स्त्री. बक्षीस. [फा.]

इति अ. १. (या)प्रमाणे, असे, – अशा तऱ्हेने इत्यादी शब्दांप्रमाणे सारखेपणा किंवा एक रीत दाखवणारे अव्यय. २. अखेर; शेवट; समाप्ती. पहा : **इतिश्री** [सं.]

इति अ. राष्ट्रीय आपत्ती : अनावृष्टी, अतिवृष्टी, टोळधाड, घुशींचा उपद्रव, पोपटांचा – पाखरांचा उपद्रव, सरकारी जुलूम, परचक्र या सात राष्ट्रीय आपत्तींचा उल्लेख 'इति' या शब्दाने करीत.

इतिकर्तव्यता, क्रिया स्त्री १. एखादी गोष्ट करण्याची पद्धत, मार्ग, रीत. २. कार्यक्रम; मुळापासून शेवटपर्यंत क्रमाने अनुष्ठान असलेले कार्य. ३. कर्तव्य; पार पाडायची कामगिरी. ४. कर्तव्याची समाप्ती; अखेरी. [सं.]

इतिकृत्ति–ती स्त्री. शिष्टसंमत आचार; वागण्याची पद्धत. [सं.]

इतिफाक पु. मैत्री, एकोपा : 'बाबुराव फडणीस व त्रिंबकराव मामा यांचा इतिफाक व सखारामपंतासी व उभयता मशारनुलेसी निफाक.' – पुणे अख १.१०३.

इतिवृत्त न. अहवाल; हकीकत; इतिहास. [सं.]

इतिश्री स्त्री. १.इतिश्री असे शब्द पुराणातील अध्यायांच्या शेवटी ('इतिश्री स्कंदपुराणे.) येतात त्यावरून शेवट; समाप्ती: 'तगटी इतिश्रिया कराव्या ।' – दास १९.१.१९ (क्रि. करणे, होणे). २. (ल.) अखेर; मृत्यू : 'तूं आज कबूल झाला असतास म्हणजे बारभाईंची इतिश्रीच होती.' – इंप ४३.

इतिहास पु. भूतकाळात एखाद्या देशात झालेल्या घडामोडींची संगतवार माहिती; एखादी संस्था, शास्त्र इ.ची सुरुवात झाल्यापासून अखेरपर्यंतची किंवा विशिष्ट मुदतीपर्यंतची संगतवार हकीगत; (सामान्यतः) एखाद्या गोष्टीची साग्र माहिती; इत्थंभूत हकीगत; वृत्तान्त; कथा. [सं. इति+ह+आस= असे घडले.] (वा.) **इतिहासाची पुनरावृत्ती होणे** – तीच घटना स्थूल रूपाने पुन्हा घडून येणे.

इतिहासकार जुन्या कागदपत्रांचे संशोधन करून इतिहास लिहिणारा माणूस.

इतिहासजमा वि. गतकालीन; स्मृतिशेष; नामशेष; मागे पडलेला : 'पॅरीस शहराचें वैभव आतां इतिहासजमा झालें आहे.' – के ६.१०.३५.

इतिहासणे सक्रि. (अर्वाचीन काव्य) – इतिहासात समाविष्ट करणे. 'मराठकर्तृत्वा दे संधि इतिहासाया नांव ।'– जननीजनकज.

इतिहासपूर्वकाल (पुरा.) कोणत्याही देशाचा, लिखित पुराव्यासह सुसंगतवार इतिहास सुरू होतो, त्यापूर्वीचा काल. यात पाषाणयुग, ताम्रपाषाणयुग, ताम्रयुग आणि कांस्ययुग यांचा समावेश होतो. भारतात अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वीचा सर्व काल साधारपणे यात मोडतो.

इतिहासलेखनशास्त्र न. (राज्य.) ऐतिहासिक संशोधन, ऐतिहासिक पद्धती व इतिहासलेखन यांच्या विकासाचा अभ्यास. [सं.]

इतिहासवाद पु. (राज्य) सर्व सामाजिक, सांस्कृतिक घटिते ऐतिहासिक नियमानुसार होत असतात सर्व तथ्ये सापेक्ष असतात व स्वतःसिद्ध अशी कुठलीही मूल्ये मानदंड वगैरे नसतात असे मानणारे, प्रतिपादन करणारे मत.

इतिहासशास्त्र न. अर्वाचीन पद्धतीने संशोधन करून ऐतिहासिक घटनांचा शोध घेणारे व चिकित्सकपणे त्याची सत्यासत्यता पडताळून पांडित्यपूर्वक मांडणी करणारे शास्त्र.

इतुकाला, इतुलाला वि. इतका; एवढा : 'दान इतुलें द्या मज दीना ।'– तुगा ३४४; 'मजकरवि वळवित : तेंथचीं इतुकाली ठेविली :' – लीचउ ५९.

इत्तिफाक पु. १. संमती; कबुली. २. मैत्री; स्नेह; जूट : 'आपले सरकारचे दस्तुरप्रमाणें शपथपूर्वक इत्तिफाकनें राहून करारमदारास अंतर न करतां' – समारो १.३२८. ३. दैव; योग; सहजप्रसंग. [फा. इत्तिफाक]

इत्तिलाअ पु. माहिती; अनुमती. पहा : **इतल्ला**

इत्तिहाद, इतेहाद पु. ऐक्य, मैत्री, दोस्ती : 'असें श्रीमंतांचे मनांत येणें हें इत्तिहादास चांगलें नाहीं' –मइसा ५.३०; 'आमची दोस्ती आणि इतेहाद पूर्वीपासून जो आहे त्यांत खलश न यावा.' –मइसा ५.३०. [फा. इत्तिहाद्]

इत्थंभूत वि. जशी घडली तशी; सविस्तर; तपशीलवार (गोष्ट हकीगत, वर्णन, निवेदन, प्रतिपादन वगैरे). [सं.]

इत्य पु. इत्यर्थ; निश्चय; निर्णय : 'येविसीचा इत्य ठैरल्यावर सेवेसी लेखण केले जाईल.' – पुणे अख ३.१०३.

इत्यफाक पु. पहा : **इतफाक** : 'त्या गोष्टीचा इत्यफाक या शादीचे खुशीचे समारंभात घडावा हें फार चांगलें.' –मइसा ७.५१.

इत्यर्थ पु. सारांश; तात्पर्य; सिद्धांतरूप अर्थ : 'तरीं तूं इत्यर्थाचें सार । इतुलें जाण ।' – ज्ञा १८.१४६. [सं.]

इत्यलम् उद्गा. शेवट; अखेर; समाप्ती. [सं.]

इत्यादि–दी, दिक वि. वगैरे; हे व इतर : 'तत्त्वांची अभिवृद्धी कशी झाली इत्यादिक गोष्टींचा विचार वास्तविक पाहतां आमचा आम्हीच करावयास पाहिजे होता.'–लोटिकेले ४.१२६. [सं.]

इत्रावणे क्रि. खोड्या करणे. पहा : **इतरणे** १ (व.)

इत्सा स्त्री. इच्छा : 'ते देत इत्साभोजन । दीप तरी चिंतामणिरत्न । छाये करिती चिंतितभोजन । कल्पतरूचे ।' – कथा २.१२.५७.

इथपर्यंत, इथपावेतो पहा : **एथपर्यंत, एथपावेतो**

इथरणे अक्रि. बेशिस्त, गैरसुधे वागणे; खवळणे; बिथरणे. [बिथरणेचा अप.]

इथलातिथला वि. कुठलाही; वेगवेगळ्या ठिकाणचा.

इथलूक, इथलोक येथपर्यंत. (खा.)

इथिलीन पु. (रसा.) दगडी कोळशात सापडणारा एक वायू; हा तैलयुक्त, रंगहीन आणि पारदर्शक असून याला मधुर पण लसणीसारखा वास येतो. [इं.]

इथिसा क्रिवि. इथे : 'इथिसा काई दुखते कायजी ' – अगतिका २२.(व.)
इथून क्रिवि. या ठिकाणाहून; या जागेपासून.
इथूनतिथून क्रिवि. १. सगळीकडून; वाटेल तिथून. २. एकूणएक, सर्वच्या सर्व.
इथे क्रिवि. १. या ठिकाणी; या जागी; या प्रदेशात. पहा : **येथे** २. एखाद्याच्या घरी; राहण्याच्या जागेत; 'त्याच्या इथे' 'माझ्या इथे'.
इथेतिथे क्रिवि. कुठे कुठे; काही ठिकाणी; या ठिकाणी त्या ठिकाणी; इकडेतिकडे.
इथेशी तिथेशी क्रिवि. इकडे तिकडे; या त्या ठिकाणी ; 'आम्ही मुलें आपली सारी भेदरून इथेशी तिथेशी उभी होतो.' – पलकोपे १४९.
इथ्र पु. (शाप.) इंधक, तेजोवाहक पदार्थ; सूक्ष्मवायू. [इं. ईथर]
इदगा पु. ईदच्या प्रार्थनेसाठी तयार केलेली जागा. [फा. ईदगाह]
इदबारात स्त्री. मानपान : ' ....शिवाय स्वारीखर्च व इदबारात पावत होती.'–इसंपेदस पमा ११०.
इदमपि सना. वि. हे देखील; हेही; हेसुद्धा : 'इदमपि धनं जितं ते शकुनि म्हणे दीप्तपावक पटानें ।' – मोसभा ४.५५. [सं.]
इदमित्थ न. सर्व कारभार; एकंदर सर्व गोष्ट; जाणावयाचे, सांगावयाचे; करावयाचे ते सगळे. [सं.]
इदरकल्याणी–नी दि. १. वात्रट; खोड्याळ : 'जातच इदरकल्याणी काय काय करंल ?' – गुशि. २. अपशकुनी; कमनशिबी; अशुभ करणारा : 'बाजिराव तसा इदरकल्याणी होता.' – भेटी ३.
इदवळा क्रिवि. या वेळी; एव्हा; एवढ्या वेळी. (गो.)[सं. इयत्+वेला]
इदळ नं. १.पावसाळ्यानंतर पेरण्यात येणारी धान्ये; रब्बीचे पीक; पाणथळ जमिनीत घ्यावयाचे पीक. २. पाणथळ जमीन.(गो.)
इदळणे क्रि. थरकाप होणे; बैचेन होणे; विदीर्ण होणे; हालणे : 'येवढ्यात शेंडांतनं पिंगळा बोलला आणि काळीज इदळलं'– ऊन ३७.
इदंता स्त्री. हे –पणा; हे अमुक असा निर्देश : 'मग इदंतेसि वाळलें ।' – ज्ञा १५.२६७. [सं.]
इदंन्याय क्रिवि. याप्रमाणे : त्यांपैकींआम्हांकडील जाब साल इदंन्याय झाला.' – पेद ३.१३. [सं.]
इदाळणे क्रि. हादरणे; उन्मळणे; पहा; **इदळणे :** 'हा निरोप ऐकून तारा पार इदाळली.' – भेटी ९.
इदी स्त्री. सणावारी दिलेली भेट. [फा. ईद]
इदीम लौकिक; अब्रू; प्रतिष्ठा.
इदूर वि. वाह्यात, आगाऊ : ' चाल् इदुरा !' कौतिक झटक्यासरशी म्हणाली.' – धग ३३
इद्दत स्त्री. (इस्लामी कायदा) एखाद्या स्त्रीचा नवरा मेल्यानंतर किंवा तिला नवऱ्याने घटस्फोट दिल्यानंतर तिने पुन्हा ज्या मुदतीत लग्न करायचे नसते ती तीन महिन्यांची मुदत.
इद्र पु. इत्यर्थ; सारांश: 'बाल पाटिलें कागद लिहून दिधला त्या कागदाचा इद्रज.' –मइसा १८.१०.
इद्रा–द्री–द्रे वि. कुरूप; आकाराने वेडेवाकडे; विद्रूप : 'ते इद्रे जनावर थेट आमच्या अंगावर आले.' – वावटळ ४१.
इद्वाटो वि. नाश करणारा; दुष्ट. (गो.)
इद्वांस पु. नाश; विध्वंस. (व.) [सं. विध्वंस]
इथरतिथर क्रिवि. चुकवाचुकवीचे; उडवाउडवीचे; ताळतंत्र नसलेले (भाषण). क्रि. करणे, मांडणे, लावणे. [इथरचे द्वि.]
इध्मा पु. विवक्षित संख्या असलेली समिधांची जुडी; श्रौतस्मार्त यागात उंबर, पळस इत्यादी वृक्षांच्या सामान्यतः पंधरा समिधांचा इध्मा उपयोगात आणतात.
इनइन स्त्री. किरकिर; घासाघासी (क्रि. करणे.)(व.) [ध्व.]
इनई स्त्री एक रोग. यात हाताला ठणका लागून सुया बोचल्यासारख्या वेदना होतात. (व.)
इनमीन अ. अवघे, सगळे मिळून : 'इनमीन दहा लोकसुद्धा सभेला नव्हते.'
इनापगम न. (ज्यो.) कोणत्याही ग्रहाचे सूर्यापासून असलेले अंतर; सूर्य व ग्रह यामधील अंतर. (व.) [सं.]
इनाम न. १.कोणत्याही अटीशिवाय दिलेली, शाश्वत, वंशपरंपरेने उपभोगावयास मिळणारी स्थावर अशी देणगी. काही विशिष्ट कामगिरीबद्दल किंवा काही विशिष्ट संस्थांना अशा देणग्या देण्याची पूर्वी पद्धत होती. स्त्रियांना चोळी–बांगडी म्हणूनही असे इनाम मिळत असे. २. देवस्थान, त्यांची व्यवस्था पाहणारे लोक यांना दिलेली जमीन वगैरे. ३. मालकी हक्क न देता उपभोगावयास देणे; घेणे; खाणे : 'हा माड याने इनाम खाल्ला.' ४. (सामा.) कोणतेही बक्षीस; नजर; देणगी. [फा.]
इनामइकराम–इक्राम पु. भेट; देणगी, बक्षीस; मानमरातब. [फा.]
इनाम इजाफत न. देणगी वाढवून देणे; देणगीची वाढ; इनामात घातलेली भर; काही विशेष कामगिरी केल्याचा मोबदला म्हणून वाढवून दिलेले इनाम.
इनाम चिटणावळ स्त्री. इनामावरील सरकारी बाब किंवा कर.
इनामचिठ्ठी स्त्री. १.जिल्ह्यातील किंवा तालुक्यातील वेगवेगळ्या इनामांची यादी, तपशील. २. इनामपत्र; इनामपट्टा, इनामखत.
इनामचौकशी – पाहणी स्त्री. दिलेल्या इनामजमिनीची तपासणी.
इनामचौथाई स्त्री. सरकारात भरणा करावयाचा इनामाचा चौथा हिस्सा.
इनामजमीन स्त्री. एखाद्या मोठ्या कामगिरीबद्दल सरकारातून बक्षीस मिळालेली सारा माफ असलेली जमीन.
इनामत स्त्री.देणगी; बक्षीस; इनामः'कित्येकांस इनामत अजरामर गांवें भूमि करून दिधली.' – चित्रगुप्त १०६. [फा.]
इनामताजम पहा : **इनामपट्टी**
इनामतिजाई स्त्री. १. इनाम जमिनीच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा. हा कर सरकार सहा किंवा दहा वर्षांनी वसूल करी. २. पूर्ण अथवा सर्वस्वी इनाम नसलेल्या इनामी जमिनीवरील साऱ्याचा तिसरा भाग : 'इदलशाही दिवाणांत हक्क चौथाई व इनामतिजाईच नव्हती.' – मइसा ३.११७. [फा.]

इनामती, इनामी वि. इनामतसंबंधी; इनामासंबंधी; इनाम मिळालेला.

इनामदार पु. इनाम धारण करणारा; इनामी जमिनीचा मालक; वतनदार. [फा.]

इनाम नोकरी स्त्री. गाव, महाल, परगणा यांची महसुली, फौजदारीसंबंधाने गावकीची कामे करणाऱ्या गावकामगारांना व परगणे अंमलदारांना देण्यात आलेले इनाम; काळीचे उत्पन्न (स्वामित्व नव्हे) म्हणजे महसूल घेण्याचा अधिकार किंवा इनामजमीनधारकांना महसूलाची पूर्ण किंवा अंशतः देण्यात आलेली सूट. इनाम मिळकती दोन प्रकारच्या असतात. प्रत्यक्ष (दुमाला) आणि अप्रत्यक्ष (परभारा).

इनामपट्टी स्त्री. १. सारामाफ जमिनीवर बसवलेला कर. आणीबाणीच्या काळात रोखीने वसूल करत असत. २. स्मशान : 'बाबा गडद इनामपट्टीत जाऊन बसलाय.' – ऊन ४१.

इनामपत्र न. इनाम दिल्यासंबंधीचे खत, पत्र, सनद; इनाम दिल्याचे राजपत्र.

इनाम परभारा पु. सरकारातून न घेता परस्पर गावाकडून वसूल करण्यात येणारे इनाम.

इनाम पासोडी स्त्री. गावकामगारांना जी किरकोळ जमीन इनाम देतात त्याबद्दल व्यापकतेने वापरायचा शब्द. जसे पाटलास पासोडीसाठी.

इनाम पाहणी स्त्री. दिलेल्या इनामजमिनींची पाहणी, तपासणी.

इनामफैजावी स्त्री. इनामी जमिनीवरील सरकार साऱ्याच्या एक तृतीयांशाइतका दरसाल सरकारात करायचा भरणा. [फा.]

इनामी वि. इनाम म्हणून मिळालेला.

इनाय(ये)त स्त्री. कृपा; बक्षीस; मेहेरबानी; वरिष्ठांकडून मिळालेली देणगी; वरिष्ठांची कृपा, दया. [अर. इनायत] (वा.) **इनायत करणे** – बक्षीस देणे. **इनायत होणे** – बक्षीस मिळणे.

इनायतनामा पु. कृपापत्र; शिफारसपत्र; आज्ञापत्र; (वरिष्ठांकडून येणाऱ्या पत्राला लावतात.) 'यांस अर्ज करितां इनायतनामा द्यावयासी विलंब करणार नाहींत.' – मइसा ८.२०२. [फा.]

इनारथी क्रिवि. काही अर्थ नसताना; विनाकारण : 'इनारथी भाऊबंधात वाकडेपणा कां?' – रैत १६.

इनांतर न. ग्रहाचे सूर्यापासूनचे अंतर.

इन्कार पु. निषेध; प्रत्याहार; नाकबुली (क्रि. करणे). [फा.]

इन्किलाब पु. क्रांती; आमूलाग्र परिवर्तन. [फा.]

इन्किलाब झिंदाबाद एक घोषणा; क्रांती चिरायू होवो ! [फा.]

इन्तिकाल पु. मृत्यू; मरण. [फा.]

इन्फंटी स्त्री. प्राथमिक शाळेतील अगदी पहिला, उजळणीचा वर्ग; बालवर्ग; बिगरी : 'ती आता पांचएक वर्षाची झाली होती, आणि हातांत पाटी पुस्तक घेऊन इन्फंटीच्या वर्गाला जात होती.'– सुदे २९. [इं. इन्फंट =मूल, बालक]

इन्फंट्री पायदळ. [इं.]

इन्फिसाल पु. निकाल; फैसला: 'त्याचा हिसाबाचे रूईनें इन्फिसाल करावा.'– मइसा ७.६८. [फा.]

इन्फ्ल्यूएन्झा पु. (आयु.) वातकफप्रधान संसर्गजन्य ज्वर, ताप : 'कांहीकांनी इन्फ्ल्यूएन्झा विकारात अभ्रकभस्माचा अशा रीतीने उपयोग केल्याचे सांगितले आहे.' [इं.]

इन्शुअरन्स न. विमा : 'कंपनीनें फक्त आपल्या नोकरांसाठी प्रॉव्हिडंट किंवा इन्शुअरन्स फंड काढावा.'– आगर ३.७३. [इं.]

इन्सान पु. मनुष्य; माणूस. [फा.]

इन्सानियत स्त्री. माणुसकी. [फा.]

इन्साफ पु. १. सत्याला धरून दिलेला न्याय; निर्णय; निवाडा. २. न्याय देण्याचे काम. [फा. इन्साफ]

इन्साफगुजी वि. इन्साफी; न्यायी. न्यायाने वागणारा.

इन्साफी वि. १. न्यायी; 'इंग्रजी इन्साफी त्यांचे येखत्यारी हेही मुन्सफ् (न्यायी) असतील.'– ऐलेख ७.३५७०. २. इन्साफ करण्यात चतुर.

इन्सुलीन न. (वै.) स्वादुग्रंथीमध्ये असलेल्या काही पेशींपासून तयार झालेले, साखरेच्या चयापचयाशी संबंधित संप्रेरक. [इं.]

इन्सोल पु. (चर्मकार व्यवसाय) जोड्याच्या आतल्या बाजूस शिवण्याचे तळ (सोल.) [इं.]

इन्स्पेक्टर पु. तपासनीस; देखरेख, तपासणी करणारा; अंमलदार. उदा. पोलीस इन्स्पेक्टर, सर्कल इन्स्पेक्टर. [इं.]

इपीतरपना पु. विचित्रपणा: 'आसा का इपीतरपना कराया लागलास?'– पाचोळा ६३. (ग्रा.)

इफळ न. समुद्राकाठच्या खाऱ्या व भरतीच्या पाण्याने बुडणाऱ्या जमिनीत वाढणारे झाड. हे सहा सात हात उंच असते. याचा विस्तार मोठा असून, डहाळ्या समुद्रात बुडालेल्या असतात. याचा पाला गुरे खातात. लाकूड चिवट व कठीण असते. याचे लाकूड जाळून त्यापासून जो क्षार होतो त्याचा उपयोग परीट कपडे धुण्यासाठी करतात. (गो.) [सं. विफल]

इफाजत स्त्री. संरक्षण; आश्रय : 'रघुनाथराऊ पेशवे ईजानबाचे इफाजतेत आहेत.' –मइसा १०.१०८. [हिफाजतचा अप.]

इफ्तदाय वि. सुरुवात; प्रारंभ : 'त्यावरून इफ्तदाये नामाजी लांडा गुमास्ता हकीकत बंदगीस जाहीर केली.'– पेद ३१.१७२.

इबत्ती स्त्री. लिंगायत लोक कपाळास लावतात ते भस्म. [सं. विभूति]

इबरत स्त्री. १. प्रतिष्ठा. पहा : **इभ्रत** २. दहशत; धाक; हाय खाणे; दरारा : 'भुजंगराऊ घोरपडे लढाईत वारलियावर लष्करानें इबरत खादली.'– पेद २८.१००.

इबाक क्रिवि. या बाजूस; इकडे. (खा.)

इबाड पु. खराबी; नासधूस; नास; बिघाड. (गो.) [सं. विघात]

इबादत स्त्री. पूजा; भक्ती; ईश्वरनिष्ठा. [फा.]

इबादती वि. धार्मिक; सश्रद्ध : 'हे बातेचा तरस मोहीबासारखे इबादती लोकांस काहींच नये हें अज्याईब आहे.'– मइसा ३.९०.[फा.]

इबारत स्त्री. भाषापद्धती; वाक्यप्रचार; शब्दप्रयोग : 'ह्या ग्रंथाच्या बैता तीस हजार आहेत, तो पार्सी भाषेचे इबारतींत आहे.'– ऐस्फुले ४५. [फा. इबारत]

इबारत स्त्री. इभ्रत; प्रतिष्ठा : 'तुमची इबारत गाईकवाडां वरी चढली.'– मइसा ३२१. [अर. इब्रत]

इबीन, इब्न पु. पुत्र; बिन (अमक्याचा मुलगा): 'येलोजी बिन मावजी इबीन चांदजी.' – पेदस १११. [फा. इब्न्]

इबूत स्त्री. विभूती; अंगारा; राख : 'ही इबूत घ्येताय, ती न्ह्या आनि तिनसान्या झाल्या की घराभोवती टाका.'– अउआ ८७.

इब्बी स्त्री. विटी; गिल्ली. (विटीदांडूच्या खेळातील). (व.)

इब्लाग स्त्री. पाठवणूक; पाठवणी : 'हमेशा मोहबतनामा इब्लाग करोन मसूर करीत जाणें.' –मइसा १०.१६४. [फा. इब्लाघ्]

इब्लिस पु. दानव; सैतान : 'कुराणांत असें सांगितलें आहे कीं इब्लिसनें अल्लाविरुद्ध बंड केलें म्हणून त्याला स्वर्गांतून हांकून लावण्यांत आलें.' –ज्ञाको (इ) १७१.
वि. (ल.) खोडकर; खोडसाळ; उनाड; उपद्व्यापी; बदमाष (मूल, कृत्य, भाषण इ.); दिसण्यास साधा पण आतल्या गाठीचा.(व.) [अर. इब्लीस्]

इब्लिसपणा पु. बदमाषी; व्रात्यपणा.

इभ पु. हत्ती : 'सरिसेपणें एकवटत इभ । मस्तकावरि ।'– ज्ञा १.१७.[सं.]

इभ्रत स्त्री. थोरवी; प्रतिष्ठा; अब्रू; वचक; दरारा; दबाव; बळ; दहशत; धाक: 'तें ठाणें इभ्रतीनें घेतलें.' – मइसा ६.२७२५. [फा. इब्रत] (वा.) **इभ्रत पडणे–** दरारा किंवा वचक बसणे : 'त्याची फौज आणवावी म्हणजे सहजच इकडे आपली इभ्रत पडेल.' – होकै. ८४.

इमदाद साह्य, मदत.

इमला पु. एक किंवा त्यापेक्षा अधिक मजले असलेले घर; इमारत; बांधकाम; वाडा; घर; मंदिर :'वैकुंठीं यशाचे इमले । बांधुन मग सुरवंशीं जन्मले ।' – ऐपो २६६. [फा.] (वा.) **इमला ढासळणे** – मसलत अंगावर येणे; काम नासणे, मोडणे, बिघडणे : '(मनोविकारांचा) लवकर नाश करावयाचा असेल तर त्यांना सुशिक्षणाचा किडा लावावा म्हणजे थोड्या वर्षांत त्यांचें पीठ होऊन त्यांचा इमला ढांसळतो.' – लोटिकेले ४.३७. **इमले रचणे** – तर्क करणे; मनोराज्य करणे : 'तिनं लग्न मोडलं एवढ्या आधारावर सगळे इमले रचायचे.'– लव्हाळी १९९.

इमलाफैला पहा : **अमलाफैला**

इमली स्त्री. चिंच; अम्ली. [हिं.]

इमाद पु. खांब; आधार. [अर. इमाद]

इमान न. १. वचन; एकनिष्ठा; सचोटी. २. श्रद्धा; विश्वास: 'त्या पंज्यापासी तुमचा इमान असावा.'– मदरू १.११३. ३. इमानपत्र, इमानाची खूण; शपथपत्र : 'इमान पाठविलें.'– ९६ कलमी. ७. ४. सदसद्विवेकबुद्धी; मनोदेवता; अंतर्याम. [फा.] (वा.) **इमान करणे, देणे** – वचन देणे; शपथ देणे; शपथेवर सांगणे : 'द्यावी शेजेची बाईल पण इमान देऊं नये.' – इपुस्त्रीपो ४२. **इमान गुंतणे–** शपथेत अडकणे; शपथ घेऊन चुकणे. **इमान घेणे–** सुरक्षित निघून जाण्याबद्दल वचन घेणे: 'सुरुंग लावून अर्धा बुरुज पाडला मग ठाणेदार व लोक घाबरले. इमान घेऊन बाहेर निघाले.'– नाग २.२०६. **इमान धरणे, इमानास जागणे–** इमान नष्ट न होऊ देणे; सचोटी न सोडणे; निष्ठा शाबूत ठेवणे.

इमानइतबार पु. एकनिष्ठा; सचोटी; प्रामाणिकपणा. [फा.]

इमानक्रिया स्त्री. इमान राखण्याबद्दल शपथ घेणे.

इमानदार, इनामतदार वि. पहा : **इमानी**

इमानदारी स्त्री. निष्ठा; सचोटी; विश्वासकता.

इमानप्रमाण न. १. प्रामाणिकपणा; विश्वासूपणा; सचोटी. २. करारमदार; आणभाक; शपथक्रिया.

इमानभाक स्त्री. आणभाक; करार.

इमानी वि. विश्वासू; प्रामाणिक; खरा; सत्यशील. [फा. इमान]

इमाने इतबारे क्रिवि. एकनिष्ठेने; प्रामाणिकपणाने.

इमाम पु. १. मुसलमानी धर्माध्यक्ष, गुरू, उपाध्याय (अलीच्या वंशजांपैकी). २. बहुमानार्थी पदवी; नायक; पुढारी, श्रेष्ठ [अर.]

इमामगड्डा पु. मुसलमान लोक हनुवटीवर राखत असलेला दाढीचा भाग, दाढी.

इमामदांडगा वि. दांडगेश्वर; उर्मट; मस्तवाल; पशुतुल्य.

इमामबाळी स्त्री. १. हत्तीच्या कानातील एक मोठी बाळी (पूर्वी ही हत्तीच्या कानात घालण्याची चाल होती.) २. एकाच कानात घालण्याची (मोती, लोलक वगैरे असलेली) बाळी.

इमामवाडा पु. १. इमामांच्या, धर्मगुरूंच्या सभा भरण्याची जागा. २. लखनौमधील एक प्रसिद्ध इमारत : 'इमामवाड्यांत तबारा गायल्याबद्दल दोन शियांना अटक झाली.'– के १२.४.४०.

इमायत स्त्री. ती संरक्षण; आश्रय; वशिला; वग: 'इमायतीच्या बळें गरिबगुरिबाला तूं गुरकाऊं नको.' – अनंतफंदी. [फा. हिमायत्]

इमारत स्त्री. १. दगड, चुना, विटा, माती, लाकूड इ. साहित्याने करावयाचे काम; बांधकाम; पायाच्या वरचे बांधकाम : 'गडाची इमारत मुस्तेद करावी.'– मराआ ३३. २. वाडा; हवेली; मंदिर; घर; इमला. ३. अंगकाठी; शरीरयष्टी; बांधा : 'घोडी पांच हजार रुपये किंमतीची होती, इमारतीनेंही थोर होती.'– ऐलेख ११.५७०६. [फा.] [वा.] **इमारत फळा येणे–** १. इमारत पूर्ण होणे; बांधकाम पुरे होणे. २. (ल.) कार्य सिद्धीस जाणे : 'संतकृपा झाली । इमारत फळा आली।'– बगाथा २२९.

इमारत स्त्री. १. अधिकार; वैभव; महानुभावित्व. २. भरवसा, मदार, विश्वास : 'आमची इमारत सर्व तुम्हावरच आहे.' – धापइसाखं ३.४.[फा.] (वा.) **इमारत असणे–** एखाद्याच्या साहाय्यावर मदार असणे; अवलंबून असणे; उभारणी असणे.

इमारतखाना पु. सरकारी इमारती व इतर सार्वजनिक बांधकामे यांची व्यवस्था पाहणारे खाते.

इमारती वि. इमारत बांधण्याला योग्य व उपयोगी; उदा. इमारती लाकूड, इमारती सामान इ. [फा. इमारत]

इम्तिनान स्त्री. उपकार. [फा.]

इम्तियाझ पु. फरक. [फा.]

इम्तिहान स्त्री. परीक्षा. [फा.]

इयत् सना. इतके, एवढे; उदा. इयत्परिणाम. [सं.]

इयत्ता स्त्री. १. इतकेपणा; ठरावीक नेमून दिलेली मर्यादा, प्रमाण, दर्जा; प्रमाणाचे मापन (गुण, काल, दर्जा इ. चे); पल्ला; टप्पा; मर्यादा नेमून देणे. उदा.– उष्णतेची इयत्ता : 'स्फूर्तीची ज्वाला अमुकच इयत्तेपर्यंत वाढली पाहिजे...' – लोटिकेले ३.२६२. २. शाळेतील अभ्यासाप्रमाणे निश्चित केलेला दर्जा; वर्ग. [सं. इयत]

इयत्तीकरण न. (ग.) संदर्भ रेषेवर अथवा वर्तुळावर ठरावीक परिमाणाएवढ्या अंतरावर खुणा करणे. [सं.]

इया–यी पु. स्त्री. विळा. विळी. (खा.)

इयाभर क्रिवि. दिवसभर, इळभर :'इयाभऱ्यांतून कितीक जात असतीन....' – धग ११.

इरकल–ली वि. विजापूर जिल्ह्यातील इलकल या गावी तयार होणारी पातळे. ही दोन रंगांच्या धाग्यांत विणल्यामुळे त्यात धुपछाव निर्माण होते.

इरगीमिरगी स्त्री. मुलांचा एक खेळ.

इरजा पु. इरजिकीच्या कामावर येणारा मनुष्य, बैल इ.

इरजिक–जीक स्त्री. जमिनीस द्यावयाची कुळवाची पाळी, पेरणी, पिकाची काढणी, मळणी वगैरे शेताचे काम करण्यासाठी जे एकाच वेळी अनेक गडी लावतात त्यांना सकाळी न्याहारी, दुपारी साधारण जेवण व संध्याकाळी मोठे जेवण घालतात ते : अशा कामाला– अन्नमय मोबदल्याला – इरजिक म्हणतात. (सामान्यत:) शेतीच्या कामास लागणारे बैल इ.ची एकमेकांनी एकमेकांस करावयाची मदत (क्रि. घेणे.) [सं. विरच]

इरड स्त्री. दिवसाचा अर्धा भाग (विशेषत: सकाळचा). (कु.)

इरड–इरवड–वाड स्त्री. १. सकाळी गावदरीस पडलेले उष्टेपाष्टे, विष्ठा इ. खाण्यासाठी गुरांचे भटकणे,हिंडणे (क्रि. करणे) २. विष्ठा वगैरे खाणे. ३. (ल.) शेजारी पाजारी आधाशीपणाने तोंड घालणे; परद्वार करणे. [का. एरू]

इरड–इरवड–वाड स्त्री. जंगलातून आणलेली लाकडाची मोळी किंवा गवताचा डोईभर भारा; डोई ओझे; भाऱ्या करिता जंगलात घातलेली फेरी.

इरड न. (विरू.) विरड. मुख्य धान्याबरोबर पेरलेले धान्य; मोगण. (क्रि. टाकणे.) [का. एरडु=दोन].

इरडणे अक्रि. रोप वगैरे उगवणे. (कर.) [का. इरडा=रोप].

इरडपाळी स्त्री. मृगाचा पाऊस पडताच कुळवाने शेतात घातलेली पाळी.

इरडा–इरडो पु. झाडाचे रोप; डांबो. (गो.) [का.]

इरण न. एक वेल. पहा : **अरणी**

इरबात, इर्तिबात स्नेह.

इरमार पु. अभिमान; गर्व; ताठा. (कु.)

इरय पु. १. एक वृक्ष; देवदार. (कु.) २. गाडीचा आस. (गो.)

इरय स्त्री. १. ईर्षा; चेव; स्फुरण. २. रुचीची पूर्तता, तीव्रता; लज्जत.

इरली स्त्री. लहान इरले. (कों.)

इरले न. १. पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून डोक्यावर घेण्यासाठी कामट्यांचा (कुंचीच्या आकाराचा) केलेला सांगाडा. यावर पळस, कुंभा, साग, केतकी यांची पाने शिवून हा तयार करतात. नारळीच्या पातींचेही इरले करतात. पानांची गावठी छत्री. २. धान्याच्या कणगीवर ठेवण्यासाठी गवताचे केलेले झाकण. (व.)

इरव(वा)ड न. पहा: **इरड;** मुख्य पिकाबरोबर पेरलेले दुसरे पीक : 'जोंधळ्याच्या पिकात इरवाड टाकावं तशी मध्येच एखादी टोपी दिसू लागली.'– पेरणी १२२.

इरवा पु. मुख्य पिकाबरोबरचे दुसरे पीक : 'बयराम मराठ्याच्या वावरात इरवा खुडाचा आये कानं'– धग ४३. (व.)

इरशा(षा)द पु. आज्ञा; आदेश; उपदेश; इच्छा : 'हुजुरीहून जो इरशाद होईल त्याप्रमाणे आम्हांस मान्य आहे.'– पुणे अख १.९४. [फा.]

इरस पु. गाडीचा आस. (कु.)

इरसरी स्त्री. वीरश्री; ईर्ष्या; त्वेष : 'लढाईच्या त्या वाजपानं तर आंगात इरसरी आल्यावानी झाली.'– रैत ७३.

इरसाल वि. १. अस्सल; वेचक : 'मवाळपक्षात प्रामाणिकपणाचे इरसाल कांदे कसे कसे आहेत तें पहा.'– केळ.१.१३९. २. पहा: **इर्साल** ३. बनेल; फाजील; अर्क; चावट: 'खोऱ्यातील इरसाल टगे सरकारला मदत करण्यासाठी जिवाचं रान करत होते.'– फकीरा १०३.

इरसाल करणे क्रि. रवाना करणे; पाठवणे; दाखल करणे : 'अर्जदास्त इरसाल केली आहे.'– शिचसाखं ५.२१.

इरळ–ळा पु. न. पहा: **इरड;** एका धान्यात पेरलेले दुसरे धान्य. उदा. – ज्वारी पेरताना मध्ये तूर पेरणे. [का. इरडु=दोन]

इरळणे, इरळण काढणे क्रि. (दाट.) दाट उगवलेल्या पिकातून काही मोड उपटून ते पीक विरळ करणे. (माण.) [सं. विरल]

इरं न. किंमत; महत्त्व; चव; लज्जत : 'ते मला चोऱ्या करूनबी मिळालं असतं, पर त्येला इरं न्हाई'– खळाळ २२.

इरा पु. पाण्याचा झरा; पऱ्हा. (ग्रा.)

इरा पु. विळा.

इराकत–गत–खत स्त्री. विराकत. (व., को) १. लघवी; लघवी करणे; लघवीस बसणे (क्रि. करणे). २. (ल.) तुच्छ मानणे; झिडकारणे : 'मी त्या पैशावर इराकत करतो.' [फा.]

इराडा काढणे क्रि. खोड मोडणे; पहा: **अरड काढणे** (माण.)

इराडे न. पहा: **इरले**

इराणी–नी वि. इराणमधील (घोडा, गाढव).
पु. इराणचा रहिवासी: 'मी बाहेर इराण्याच्या दुकानात चहा प्यायला गेलों होतों'– नाकु ३.३९. [फा.]

इरादत इच्छा असण्याचा भाव.

इरादा पु. १.विचार; हेतू; बेत; संकल्प; उद्देश; इच्छा. २. योग्यता; अधिकार : 'पुरंधऱ्यांची कदीम इरादा । तत्पर पेठे मोंगल वादा ।'– ऐपो २१९. [फा.]

इराप स्त्री. (सुतारकाम) फळीच्या कोपऱ्यास करायची गोलची.

इराब वि. पहा: **इरेफ**

इरिडियम न. (शाप.) प्लॅटिनम वर्गातील एक मूलद्रव्य. हे फाऊंटन पेनच्या टोकास लावतात. पहा: **ऐंद्र** [इं.]

इरिय न. वीर्य: 'सूर्यनारायणाचे इरिये वाहुटात पडले.'– जसा ७९७.

इरी स्त्री. विडी. (कों.)

इरी स्त्री. ईर्षा; खिजवणूक : 'आम्हांस इऱ्या देऊन लिहितात.'– लेखरत्न ९९.

इरीरी, इरिइरि करणे क्रि. १. बैलांना हाकणे, चुचकारणे: 'इरिरि पोपो. (तेलगु-चल चल) दादा, झाझा.' २. (ल.) शेती करणे; शेतकरी बनणे: 'तूं शिकतलय कीं इरीइरी करतलय.' (कु.)

इरुद क्रिवि. विरुद्ध : 'कुणी तुज्या इरुद गेला आसल तर आपुन गोत भरवू.'– जैजै ४१.

इरे स्त्री. ईर्षा. पहा: **ईर**

इरेफ वि. क्रिवि. (शिंपी) तिरपे; वाकडे; तिरकसपणे; वाकड्या रीतीने (कापणे). रास किंवा कास (सरळ) याच्या उलट. [सं. विरेफ]

इरेब् स्त्री. वाकडी रेघ; वक्र लेखन.

इरेसरी स्त्री. शौर्य; धाडस. [सं. वीरश्री]

इरोळी स्त्री. गुरांच्या पायास होणारा एक रोग.

इर्जिक पहा : **इरजिक** : 'नांगरणीसाठी इर्जिकी करतात.'– पया १५३.

इर्तिबात स्त्री. स्नेह; मैत्री : 'पंत साहेबांसी व आम्हांसी दोस्ती व इर्तिबात कदीम आहे.'– दिमरा १.४५. [फा. इर्तिबात]

इर्मित स्त्री. ख्रिस्ती धर्मप्रचारकांचा मठ. (गो.)[पोर्तु. इर्मिडा]

इर्शाद पु. हुकूम; आज्ञा; उपदेश : 'रामाजी महादेव यास इर्शाद फर्मावून.'– ऐलेख ७.३५६५. [फा.]

इर्साल पु. १. पाठवणूक; रवानगी : 'चित्तांत आल्यास माझें विनंतीपत्र व जिन्नस इर्साल करावे.'– मइसा १.१४७. २. सरकारी खजिन्यात भरावयाचा, पाठवण्याचा पैसा : 'यावर तमाम लष्करास व वाणियांस ताकीद करून इर्साल पोहोंचवून दिल्हा.' – इमं १९५.

वि. १. अगदी उत्तम दर्जाचा; गुणाने अत्युत्कृष्ट. (आंबा, इतर फळे व त्यांची झाडे यांबाबत म्हणतात. तसेच बाहेर पाठविण्याजोगी, अत्युत्कृष्ट फळे, फुले, झाडे, बिया यांनाही हे विशेषण लावतात.) निवडक, वेचक, अस्सल, अव्वल. २. अट्टल; बेरकी; वस्ताद; पक्का (लबाड, चोर, भामटा, खोटारडा माणूस वगैरे). [फा.]

इर्सालनामा-पट्टी पु. स्त्री. खजिन्यात भरावयाच्या पैशांचा तपशील अथवा सरकारात भरावयाच्या किंवा भरणा केलेल्या रकमेची यादी.

इर्सालभरणा पु. महालाकडून खजिन्यात पाठवलेला वसूल, पैसा.

इलगार पु. हल्ला. पहा: **एल्गार** [फा. इल्घार= लुटालूट]

इल(ला)जाम पु. आरोप; दोष; ठपका: 'न दिल्यावर आम्हावर इलजाम आहे. तुम्हावर नाही.'– नाग २.९१. [फा.]

इलतम(मा)स स्त्री. अर्ज; निवेदन; विज्ञप्ति; विनंती. पहा : **इल्तिमास** : 'मग आपले बाहे देशमुख व देसकुलकर्णी यांनीं इलतमस केली कीं...' –पेद १७.१४. [फा.]

इलतवा पु. थांबून राहणे; स्थगिती; बाजूस घेणे. [फा.]

इलतिजा स्त्री. विनंती : 'सखाराम पंतांनी हुजुरात इलतिजा करून....' पुणे अख १.१०३.

इलम, ईलम पु. १. शास्त्र; विद्या; कला; हुन्नर. २. उपाय; इलाज; साधन; प्रयत्न; युक्ती. ३. जादूटोणा; मंत्रतंत्र; इंद्रजाल.

वि. इलमी; इलमबाज. [फा. इल्म]

इलमती स्त्री. १. होड; पैज : 'माझा गुरु थोर तुझा लहान । ऐसे भांडती इल्मति लाउन.'– योसं १३.६५. २. बुद्धी.

इलमबाज, इलमी वि. १. इलम जाणणारा; जादूगार; मांत्रिक. २. बुद्धिवान; हुशार; हुन्नरी. [फा. इल्म]

इलहाम पु. ईश्वरी आदेश; अंत:स्फुरण. [फा.]

इला स्त्री. पृथ्वी.

इलाईत-यत स्त्री. परमुलुख; विलायत; परदेश: 'देश इलाईत । काबीज केलें तळकोंकण ।' – इपुस्त्रिपो [फा. विलायत]

इलाखा-का पु. १. हक्क; ताबा; सत्ता अवलंबन : 'रघुनाथराव इलाखा राखणार नाही.'– ऐलेख ७.३५७३. २. परिवार; बायकामाणसे; खटला : 'सर्व रायगडावरी संभाजीराजे यांचा इलाखा (परिवार) राहिला.'– मराचिथोशा २५. ३. संबंध : 'तुम्हांसी त्याचा इलाखा नाहीं'– सभासद ४२. ४. परगणा; प्रांत; शहरहद्द; राज्यकारभाराची विशिष्ट भौगोलिक मर्यादा : 'या देशांत इंग्रजांची प्राबल्यता जाहलिया अगोदरी नवाब मुहम्मद अली खानाचें इलाकेंत आम्हीं होतों.'– तंरा १००. ५. पालखीच्या दांडीस लावायचे लहान गोंडे. ६. वसुलीवर वरात; तनखा; वतन. [फा.]

इलागत क्रिवि. क्वचित; एखाद्या वेळी. (व.)

इलाचा पु. एक प्रकारचे गभरेशमी कापड; उंची कापड. [हिं.]

इलाची, इलायची स्त्री. वेलदोडा; वेलची; वेलची दाणा. [सं. एला]

इलाज पु. उपाय; उपचार; युक्ती. [अर. इलाज्] (वा.) **इलाज नसणे**– निरुपाय होणे.

इलामत स्त्री. अबदागीर, छत्री, सूर्यपान वगैरे इतमाम. (गो.)

इलायची दाणा पु. आत वेलची घालून केलेला साखरफुटाणा.

इलायती केळे न. लहान व चांगल्या जातीचे केळे.

इलावृत्त न. जंबुद्वीपाच्या नऊ खंडांतील एक खंड. प्राचीन जगाचा एक भाग. हा मेरूपर्वताच्या सभोवताली समचतुर्भुजाकृतीप्रमाणे वसलेला असून भोवतीने नील, निषध, माल्यवान व गंधमादन हे पर्वत आहेत.

इलाही वि. ईश्वरी; ईश्वरासंबंधी; दैवी. [अर.]

इलाही-ई-बिघा पु. अकबरी बिघा; इलाही गजाने मोजलेला बिघा.

इलाही गज अकबराच्या कारकिर्दीत राजा तोडरमल याने राज्यातील जमीन मोजण्याकरिता उपयोगात आणलेली साखळी, पट्टी. हा गज ४१ अंगुळाचा असे. इंग्रजी अंमलात इलाही गजाची लांबी ३३ इंच

ठरवण्यात आली.

इलाही सन पु. अकबर बादशहाने सुरू केलेला एक शक. हा अकबर व जहांगीर या दोनच बादशहांच्या कारकिर्दीत चालू होता. पुढे शहाजहानने हा शक बंद केला म्हणून वरील दोन बादशहांच्या कारकीर्दीतील कागदपत्रे, नाणी यांवर हा शक आढळतो. इलाही शकात १५५५-५६ मिळवले असता इसवी सनाचे वर्ष निघते.

इलिसा, इलु-लू, इलुसा वि. थोडा; थोडासा; अल्प; अगदी लहान. पहा : **इवलासा** : 'व्यंग इलुहि त्यांत जाण.'- दावि १९४; 'बोले ऐसें लावूं न शके कोणीही दोष धीरा ज्या । राजासि विशल्य करी देउनि इलुसीच औषधी राजा ।।'- मोभीष्म ८.८. [सं. अल्पीयस्]

इलेक्ट्रागंड पु. (मानस.) मुलीचे बापाबद्दलचे सुप्त लैंगिक आकर्षण; पितृभाव गंड. (इलेक्ट्रा : ग्रीक पुराणकथेतील एक स्त्री.)

इलेक्ट्रॉड पु. (विअ.) विद्युतप्रवाहवाहक. [इं.]

इलेक्ट्रॉन पु. (भौ.) ऋणविद्युतभारित अणूचा घटकांश [इं.]

इलेक्शन न. १. निवडणूक; पसंती, २. सभासदांची निवडणूक: 'नेहमीं नेहमीं टिळक नि गोखले, आणि धर्म नि इलेक्शन, संसार नाहीं होत कांहीं.'- सुदे ४८. [इं.]

इल्काब पु. पदव्यांची मालिका. 'दसपटीचे मोकाशी, खोत, 'इनामदार हा मोठा इल्काब मात्र कधीं कधीं ...'- लशिआ ५०२. [फा.]

इल्जाम पु. आळ; दोष; दोषाची शाबिती. [फा. इल्झाम]

इल्तिमास स्त्री. विनंती; विनवणी; अर्जी : 'ये बाबें तुम्ही इलतिमास लिहिली.'- इमं ७५. [फा.]

इल्लत वि. व्यसनी ; खोडकर; द्वाड; उपद्व्यापी. (व.)
स्त्री. व्यसन; खोड; दोष; रोग. (व.) [फा.]

इल्लत-थ स्त्री. हत्यार; उपकरण; आउत; भोक पाडण्याचे अणकुचीदार हत्यार. [फा. आलात]

इल्ला पु. समाप्ती; अभाव; नकार; नसणे : 'सामानसुमान सारे इल्ला ।' - माजी ८५.[का.] (वा.) **इल्ला बिल्ला करणे-दाखवणे-** नकार देणे; नन्नाचा पाढा वाचणे; आढेवेढे घेणे; काकू करणे : 'वळखून ठेवलें तुला फाकडे, किती करशी इल्लेबिल्ले.'- पला १०९.

इल्लां वि. थोडे. पहा : **इवले**. इतर रूपे- इल्ले, इदले, इल्लो. (कु.)

इल्लातिल्ला वि. लहानसहान. (गो.)

इल्लु न. (शिंपी व्यवसाय) गुंडीचे, बटणाचे भोक; काज : 'हुकाचीं बटणें आहेत त्यांचे इल्लू सदरहूप्रमाणें करून ठेवावेत.'- शिकशि १.१३. [इं. होल]

इल्हण वि. जाळ्यासारखे विरविरीत; विरळ; पातळ (व.)

इल्हाक पु. १. जोडणी. २. सही : 'अजमतखान यांचा इल्हाक. सर्बुलंदजंग यांचे दस्खत.'- मइसा ७.४५. [फा.]

इल्हाळी स्त्री. सुंदर स्त्री. पहा : **वेल्हाळी** : 'इल्हाळीला दु:ख झालं चोळू चोळू लाल केलं.'- एहोराभा ६.१७.

इवइव करणे क्रि. कोंबड्यास बोलावणे. (कु.)

इवला, इवलासा, इवलिसा वि. थोडा; एवढासा; एवढा; उलिसा; किंचित; मूठभर; चिमटीभर; नखभर : 'समयीं आलिया याचक। इवली भीक न घालिती ।'- एभा ७.२८५. [सं. अल्प -अल्पीयस्]

इवलाले वि. छोटेसे; लहान आकाराचे : 'डझनभर इवलाली राजपूत राज्ये अस्तित्वात होती.'- चंद १.

इवशी स्त्री. अवदसा. पहा : **विवशी** : 'धाड पडो रे त्या मुलखाशीं । कुणिकुन आली इवशी ।'- ऐपो १२४.

इवाइन न. संकट. (व.)

इवाई-य-ही पु. व्याही. (ग्रा.)

इवूळ स्त्री. तीव्रता: 'वाऱ्याची झुळूक सुरू झाली त्याने थंडीची इवूळ वाढली.'- परेपा २६०.

इशक आवड; हौस. पहा: **इश्क** : 'श्रीमंत राजेश्री बाजीरावसाहेब व चिमाजीआप्पा यांसी घोड्यावर बसावयाचा इशक बहुत आहे.'- ऐलेसं ९.४८३३. [फा. इश्क]

इशर, इशरीन पहा: **अशर, इशरीन**

इशाड न. नांगराचा एक भाग; इसाड; नांगराचा दांडा; नांगराच्या जोखडास बांधायचे लांब लाकूड; नांगर ओढला जाण्यासाठी ज्याची एक बाजू नांगरखुंटाच्या भोकात बसवलेली असून दुसरी बाजू बैलांच्या मानेवरील जुवाच्या मधोमध बांधलेली असते असे लाकूड. दोरीतून निसटू नये म्हणून याला दाते पाडलेले असतात.(कु.) [सं. ईषा]

इशाड-साड न. खुंटीचे कलम; कलम बांधलेले खोड. (गो.) [सं. ईषा]

इशाड्याचा आंबा पु. ज्या आंब्याच्या झाडावर कलम केले आहे असा आंबा; कलमी आंब्याचे झाड.

इशारत स्त्री. १. खूण : 'तेज्या इशारती । तट्टा फोकावरी घेती।'- तुगा ३७४८. २. सूचना; ताकीद; खबर. [फा.]

इशारा-इषारा पु. चेतावणी. पहा: **इशारत** [फा.]

इशी स्त्री. १. उद्गा. (बाल) शी; घाण; मलमूत्रोत्सर्ग; घाणेरडा पदार्थ. २. नकारदर्शक, तिरस्कारदर्शक उद्गार. पहा: **इश्श**

इशीम स्त्री. १. अभिमान; अब्रूची चाड; आपल्या नावाची, लौकिकाची, मोठेपणाची जाणीव. २. धमक : 'असलं अंगांत इशीम, त आनतील त्यांना पैठन्या !'- परेपा १०५. [फा. हशम्]

इश्क पु. १. प्रणय; शृंगार; विलास: 'आम्ही तर दर्दी, इश्काचे भुकेले प्राणी.'- प्रला २. नाद; छंद; आवड; शौक; ओढा. [फा.]

इश्कपेच न. जाईची वेल व फूल : 'इश्कपेंच गुल्छबू सदोदित भर शेवती सांवरी'- प्रला १५४.

इश्कबाज वि. चैनी; विलासी; स्त्रीलंपट. [फा.]

इश्कबाजी स्त्री. १. प्रेमलीला; प्रणयविलास; आशकबाजी. २. रांडबाजी; बाहेरचा नाद. ३. चैन. [फा.]

इश्की वि. प्रेमाचा.

इश्ति-हार-स्ति-स्ते पु. प्रसिद्धिपत्रक; जाहिरात; प्रसिद्ध करण्याचा मजकूर; जाहीरनामा. [फा. इश्तिहार]

इश्श, इश्शरे, इश्शो, इश्श्यो उद्गा. (बायकी.) लाज, नापसंती, तिरस्कार, आग्रह इ. व्यक्त करताना निघणारा उद्गार. छी; छे:

इष पु. (ज्यो.) सौरमासांपैकी एक मास. याचे दिवस तीस असतात.

इषतिबाह पु. शंका; संशय; अस्पष्टता. [फा. इश्तिबाह]

इषारत (इषारत्) स्त्री. पहा : **इशारत** : 'भिम्या आचाऱ्याला इषारत द्यायची फुरसत.' –समक १.११७.

इषिका स्त्री. काडी : 'मग दर्भइषिका धरूनि करीं । मंत्रुनि सोडिल्या कूपोदरीं ।' – मुआदि ३०.११०.

इष्क पु. पहा : **इश्क**

इष्क खिलवणा वि. इष्काच्या विविध प्रकारांतील दर्दी.

इष्कल, इष्कील स्त्री. अडचण; घोटाळा; व्यत्यय; हरकत; तंटा. (क्रि. करणे, घालणे, पडणे, पाडणे). [फा. इश्काल]

इष्की स्त्री ऐट; रुबाब : 'यापुढं इष्कींत राह्यचं ठरवलं आहे.' – कलंदर १५३.

इष्कीबाजी स्त्री. चैन; मौजमजा. पहा : **इश्कबाजी** : 'पैसा फार फार होत चालला म्हणजे .. इष्कीबाजी वाढते.' – निमा ५३.

इष्ट वि. १. इच्छिलेले; आवडते; पसंत केलेले; हवे असलेले; मानलेले; योग्य. २. शुभ; हितप्रद; कल्याणप्रद : 'सहज इष्टानिष्ट करणी । दोघीचि इया कवतुकिणी ।' – ज्ञा १६.६१. ३. (ग.) इच्छेने धरलेली किंवा मानलेली; गृहीत (काल, घटी, वेळ) जसे – इष्टघटी, इष्टकाळ. पु. मित्र; स्नेही; हितचिंतक; जसे – इष्टदर्शन; इष्टमंडळी, इष्टी; यज्ञयागादी कर्म; स्नान, दीक्षा इ. आवश्यक कर्म : 'जे इष्ट यज्ञ यजावे । तें हविर्मंत्रादी आघवें ।' – ज्ञा ४.१२०.

इष्टआप्त पु. आप्तेष्ट; स्नेहीसोबती; नात्याची माणसे. [सं.]

इष्टकर्म न. (ग.) त्रैराशिक; त्रैराशिकाच्या रीतीने उदाहरण सोडविण्याची पद्धत; क्रिया. [सं.]

इष्ट कल्पना स्त्री. (तर्क.ग.) गृहीत कल्पना; प्रथम खरी मानलेली गोष्ट; गृहीत कृत्य; सिद्धवत गोष्ट; कल्पित पक्ष.

इष्टका स्त्री. १. वीट. २. (यंअ.) एखाद्या घन पदार्थाचा चौकोनी त्रिमितीय तुकडा; एखाद्या घन पदार्थाची, धातूची वीट. [सं.]

इष्टकाल पु. १. शुभ वेळ; कोणत्याही कार्यास पाहिजे तशी वेळ; शुभ काळ (क्रि. येणे). २. लग्न साधनासाठी सूर्योदयापासून जन्मकालापर्यंतचे जे अंतर ते म्हणजेच इष्टकाल.

इष्टकी स्त्री. मैत्री. (कु.)[सं. इष्टक]

इष्टतम वि. अधिकात अधिक फळ देणारा; फलप्रद; अनुकूल. [सं.]

इष्टतम वारंवारता स्त्री. (विअ.) अनुकूल परिस्थिती पुन्हापुन्हा येणे.

इष्टती क्रिवि. समजुतीने; स्नेहभावाने : 'त्वां जावोनि वैरियांसी ।इष्टतीं सांगा वादीयांसी ।' – गुच ३५.२५६. [सं. इष्टत्व]

इष्टत्व न. १. मैत्री; स्नेहभाव; समजूतदारपणा : 'इष्टत्वें मागती कितीएक।' – गुच ८.६९. २. मांगल्य; शुभदायकता. [सं.]

इष्टदा वि. इच्छित वस्तू देणारी : 'इष्टदा परी अनिष्टा । हेतु होती ।' – ज्ञा १६.२१९

इष्टदेवता – दैवत स्त्री. न. आपली भक्ती जीवर आहे अशी देवता; आराध्यदैवत; पालनकर्ता देव, साधू इ. [सं.]

इष्टदेवतावाद पु. आपल्या कुळाचे, कुटुंबाचे किंवा जमातीचे दैवत म्हणून एकाच दैवताची उपासना, पूजा. [सं.]

इष्टपंगत– भोजन स्त्री. न. श्राद्धाच्या दिवशी श्राद्धीय ब्राह्मणांचे जेवण झाल्यावर यजमानाने आपल्या इष्टमित्रांसह करावयाचे भोजन.

इष्टमित्र पु. स्नेही सोबती; सोयरेधायरे; ओळखीपाळखीचे लोक; हितचिंतकः 'इष्ट मित्र आपुले । कुमरजन देखिलें ।' – ज्ञा १.१८१.[सं.]

इष्टराशि–शी, इष्टराशिक स्त्री. न. (ग.) १. त्रिराशिक, पहा : **इष्टकर्म** : 'इष्टराशींमध्ये एकेरी व दुहेरी असे दोन प्रकार आहेत.' २. गृहीतसंख्या; धरलेली संख्या; इष्टसंख्या.

इष्टसंख्या स्त्री. गृहीतसंख्या. पहा : **इष्टराशी** २. [सं.]

इष्टागत स्त्री. मैत्री. (गो.) [सं.]

इष्टानिष्ट वि. आवडते नावडते; आवडीचे नावडीचे; शुभाशुभ; मंगलअमंगल : 'इष्टानिष्ट तैसें । जगाच्या ठायीं ।' – ज्ञा १३.६०१.[सं.]

इष्टापत्ति–त्ती स्त्री. ज्या संकटाचा किंवा बाहेरून वाईट दिसणाऱ्या गोष्टीचा परिणाम हितकारक ठरतो अशी गोष्ट; आपल्याला हवी असणारी, अनुकूल गोष्ट आयती घडणे; मिळणे : 'पाकिस्तान व चीन यांच्याशी झालेली युद्धे इष्टापत्तीच ठरली.' – युद्ध ३. [सं.]

इष्टापूर्त न. एखादे धार्मिक, दानधर्माचे मोठे कृत्य; इष्ट म्हणजे यज्ञयागादी श्रौतस्मार्त कर्मे व पूर्त म्हणजे तलाव, धर्मशाळा, विहीरी वगैरे बांधून त्यांचा उत्सर्ग करणे वगैरे धार्मिक कृत्य : 'आणि सचाडाचिये परी । इष्टापूर्ते करी ।' – ज्ञा १३.५२४. [सं.]

इष्टार्थ पु. (शाप.) १. इप्सितार्थ. २. मनःकल्पना. ३. स्पृहा. ४. अभिलाष. ५. तृष्णा. ६. पुण्यवासना. ७. इष्टवस्तुलाभ. ८. वांछित. ९. अभिलषित. [सं.]

इष्टांक पु. (ग.) इष्ट संख्या; इष्टराशी; अंदाजलेली, गृहीत धरलेली रक्कम : 'जी किंमत इष्टांकरूपाने संकल्पिली.' – के २.८.३०.[सं.]

इ(ष्ट)ष्टिका स्त्री. १. वीट. २.(ग.) जिचे सहाही पृष्ठभाग आयताकृती आहेत, अशी सहा पृष्ठभागांनी सीमित असलेली त्रिमित आकृती. [सं.]

इष्टि–ष्टी स्त्री. अग्निहोत्र्याने दर महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या प्रतिपदेस करावयाचा याग. अग्निहोत्र घेतल्यापासून ते नष्ट होईपर्यंत अग्निहोत्र्याने हा याग करावयाचा असतो. इष्टीत नित्य (दर्शपूर्णमास), नैमित्तिक (आग्रयणेष्टी, वर्धापनेष्टी इ.) व काही काम्य (वर्षकामेष्टी, पवित्रेष्टी इ.) आहेत. [सं. इष्]

इष्टीण स्त्री. मैत्रीण. (कु.)[सं. इष्ट]

इसकणे क्रि. थोडेसे खणणे. पहा : **विसकणे** (कु.)

इसकाड न. (कृषी) नांगराचा दांडा.

इसकी न. (कृषी) कोळपे जमिनीत दाबण्याकरिता कोळप्याच्या दिंडात बसवलेला दांडा, लाकूड.

इसकील स्त्री. खोड; उणे; सबब : 'इकडे काहीही इसकील न काढता .....' – ओंकार २१.

इसन इसान न. पहा : **विसण**

इसन्ने–ने वि. दोन ही संख्या; अरबी वर्ष मोजताना योजतात. [फा.]

इसन्ने अशर वि. बारा इमाम; बारा संख्या; याचा वर्षगणनेत उपयोग

करतात. [फा. इस्ना+अशर]

इसप–ब पु. १. विसर्प; हातापायावर होणारा गजकर्णासारखा एक चर्मरोग. यात खूप खाज सुटते, पुरळ येते, कातडी कडक व गाठाड होते. हा फार चिवट व दुर्धर रोग समजला जातो. २. जनावराच्या अंगावरील लालसर काळा, गोचिडासारखा किडा. [सं. विसर्प]

इसबगोल पु. सफेदजिरे; एक औषधी बी. हे बी आकाराने मोहरी एवढे असते. याच्या पांढरे, तांबडे व काळे अशा जाती आहेत.

इसबंद पु. मेंदीचे बी. भुताखेतांची किंवा दृष्टीची बाधा होऊ नये म्हणून विवाह, प्रसूती वगैरे प्रसंगी हे जाळतात. [फा. इस्पंद]

इसम, इसीम पु. १. विशेषनाम, नाव. २. मनुष्य; असामी.
न. (हिशोबात) नग; सदर; नगाचे वर्णन; खात्याचे वर्णन; वर्गाचे नाव; बाब; जात. [अर. इस्म=नाव].

इसमनविशी स्त्री. नावनिशी; नामावली : 'इसमनविशीची फर्द लिहून नबाबांस अर्ज केली.' – मइसा ५.१२७. [फा. इस्मन्‌विसी]

इसममजकूर वि. (सरकारी कागदपत्रातून) वर, मागे उल्लेखिलेला; उपरोल्लेखित; उपरनिर्दिष्ट (मनुष्य). [फा.]

इसममुबादला पु. १. (हजेरीपत्रकात) बदलून घातलेले नाव; बदली नाव. २. बदली माणूस; दुसऱ्याबद्दल काम करणारा इसम. [फा.]

इसमवार क्रिवि. १. नावाच्या अनुक्रमाने; नावापुढे नाव असे; नावनिशीवार. २. हिशेबाच्या सविस्तर बाबीप्रमाणे. [फा.]

इसमवार कमजास्ती स्त्री. पगार नोंदीसह नावाचा तक्ता. सामा. शब्द – इसमवार- अर्जी. नावनिशी, पट्टा, पत्रक, पाहणी, पावती, फाजील, वसुलीबाकी, सूट, हाजरी, रुजवात इ.

इसमवारी स्त्री. नावाचा तक्ता; नावांची यादी; हजेरी; उपस्थितीपत्रक.

इसमा पु. विसावा; विश्रांती : 'माहेराची जोत बाई । बसीन पित्याच्यापाशीं । गोष्ट ऐकोन हिताची । देईल इसमा काशी ।' – वलो ९४. (व.)[सं. विश्राम]

इसमारी स्त्री. पाल; एक प्राणी. (खा.)

इसरा पु. स्त्री. मालमत्ता; चीजवस्तू. [फा. आसार = परंपरा]

इसरावाडी स्त्री. मालमत्ता; इसरा. (व.)

इसवी वि. ख्रिस्ती.
स्त्री. ख्रिस्ती शक. [फा. ईसवी]

इसवी सन पु. ख्रिस्ती शक. हा येशू ख्रिस्ताच्या जन्मापासून धरला आहे.

इसळणे क्रि. उसळणे; संतापणे ; रागावणे : 'नवरा तिच्यावर इसळतही असे.' –बलुतं १२०.

इसा स्त्री. घराच्या छपराला धूर लागून जमलेले धुराचे किटण. (व.)

इसा स्त्री. वीस; वीस या संख्येचे (पदार्थाचे) गट : 'म्हणून श्यानी एक दोन इसा वाघासनी मारूनशानी सरस्वतीच्या आल्याड आलों.' – बाय २.२. [सं. विशंति.]

इसाड, इसाप (इसाड्) न. नांगराचा एक भाग; नांगराच्या खुंटात रोवलेली धुरी. [सं. ईषा+दंड]

इसाडा पु. तोडलेल्या झाडाचा काही बुंधा शिल्लक ठेवून त्याच्यावर त्याच झाडाची कलमे लावून केलेले नवे झाड.

इसापत–फत पहा : **इजाफत**

इसारकी स्त्री. नांगराच्या इसाडाला मागील शेवटास (नांगरात बसवलेल्या) असलेली खीळ.

इसारा पु. (अर्थ.) खरेदी पक्की झाल्याचे चिन्ह म्हणून खरेदीदाराने विक्रेत्याला आगाऊ दिलेली रक्कम; करार करण्याच्या वेळी तारण म्हणून दिलेली रक्कम, बयाणा.

इसाळ–ळा पु. १. स्पर्धा; स्पर्धेचे–चढाओढीचे वारे; चुरस; चढाओढ; अहमहमिका; हेवा; खुमखुमी. (क्रि. धरणे, येणे) : 'पद्मदळेंसीं साळें । भांडताति जे हे डोळे ।' – ज्ञा १३.५६०. २. चीड; तिटकारा : 'वाचे सत्याचा विटाळ । इंद्रियनियमांचा इसाळ ।।' – मुआदि १.६७. ३. संशय : 'तो आपुलिए स्त्रीएचा इसाळु करी.' – दृपा ८२. [सं. ईर्षा]

इसाळा पु. ऐन जिन्नसी मोबदला; शंभर पेंढ्यास अमुक पेंढ्या देण्याचे ठरवून काम करणे. (माण.)

इसाळा–ला, इसोळा पु. ज्वारीवरील रोग.

इसाळाइसळी, इसळाइसळी, इसलाइसला क्रिवि. स्पर्धेने; ईर्षेने; चढाओढीने.

इसाळू, इसाळ्या, इसाळा वि. स्पर्धाळू; चढाओढ करण्यास उत्सुक.
पु. आसक्त; लंपट; मत्सरी : 'आणि इसाळु जैसा घरा । कां दंदिया हतियेरा । न विसंबे भांडारा । बद्धकु जैसा ।।' –ज्ञा १३.५०२.[सं. ईर्षालु]

इसिम पु. त्वेष. [फा.]

इसूप–ब पु. पहा : **इसप–ब**

इस्कलबाज वि. हिकमती; कावेबाज; रंगेल : 'तात्या इनामदार हा महा इस्कलबाज माणूस असला पाहिजे.' –मिरास १७४.

इस्काद स्त्री. जिना. (गो.)[पोर्तु. इस्काड].

इस्काल, इस्कील, इस्कीलकी स्त्री. हरकत; अडचण; तंटा : 'चांदजीराव इस्कील करील तर त्यासही माकूल करून सांगणे.' – मइसा ८.९७. [फा. इश्काल् = अडचण.]

इस्कीदार वि. ऐटबाज; शानदार : 'डोकीवर इश्कीदार जरीची टोपी अगर शेमला सोडलेला फेटा असावयाचा.' –नाता ६५.

इस्कू(स्को)ट पु. नाश; विसकट : 'केला का समदा इस्कूट पानाचा.' – मिरास ३१९.

इस्टिक स्त्री. इस्टेट; मालमत्ता; संपत्ती : 'समदी इस्टिक त्येला देनार होता.' – परेपा ८०.

इस्टिकालेख पु. (उत्खननात मिळणारे) विटांवर कोरलेले लेख : 'इजिप्तमधील जुन्या इस्टिकालेखाचे स्वरूप ...' – काढ १९८.

इस्टुर फाकडा पु. बाजीराव; ऐटीचा माणूस : 'एवडा इस्टुर फाकडा आहेस तर आलास कशाला?' – मिरास २०२. (एल्फिन्स्टन साहेबाला पेशवाईत या अपभ्रष्ट नावाने संबोधण्यात येत असे.)

इस्टेट स्त्री. स्थावर मालमत्ता, संपदा; (सामान्यतः) मालमत्ता :

'अज्ञानासंबंधानें ही इस्टेट कोर्टाच्या ताब्यात जाऊन तिच्या व्यवस्थेकरितां रोल्ट साहेबांची नेमणूक झालेली होती.' – लोटिकेले २.५७७.[इं.]

इस्त स्त्री. १. इज्जत; इभ्रत. (गो.) २. बेअब्रू.

इस्तक्बाल पु. सामोरे जाणे; सन्मान, आगतस्वागत : '... यास इस्तकबाल करावयासी स्वामी समर्थ आहेत.' – इएम्पी ९४. वि. भविष्यकालीन; भावी : 'कार्कुनानी हाल व इस्तक्बाल ...' (हल्लीचे व भावी कार्कुन). [फा. इस्तिक्बाल]

इस्तक्बील शअ. पासून (मागील विशिष्ट गोष्टीपासून किंवा तारखेपासून तो दिवस धरून) पुढे; सुरुवातीची मिती; एखाद्या व्यवहाराचा आरंभकाल; हा शब्द तागायत शब्दाला जोडून येतो : 'इस्तक्बील चैत्र तागायत फाल्गुन.' [फा. इस्तिक्बाल]

इस्तक्लाल पु. जोर; धीर; धर. : 'या फौजेचा इस्तक्लाल राहिला नाहीं तेव्हा सुलूक आरंभिला.' – मइसा ६.४४०.[फा. इस्तिक्लाल]

इस्तमरारी स्त्री. कायमधारा पद्धती. [फा. इस्तिमरार]

इस्तमाल पु. उपयोग. [फा.]

इस्तमालत, इस्तमाली स्त्री. १. दिल–दिलासा; मनाला बरे वाटेल असे बोलणे; समजावणी. २. लावणी, संचणी; कीर्द, महामुरी : 'आबादीस व इस्तमालतीस कोसीस करून.' –मइसा १५.१२३. [फा. इस्तिमालत]

इस्तमाली स्त्री. १. वहिवाट; परिपाठ; अभ्यास. २. पहा : **इस्तिमालत** वि. मामुली; जुनापुराणा; वापरण्यायोग्य.

इस्तमेल स्त्री. १. (हिशोब) जमाखर्चाची एक बाब; जमेच्या रकमा खर्ची व खर्चाच्या रकमा जमा टाकणे, मांडणे. उदा. धान्य वगैरे प्रथम खर्ची टाकून त्याचे पीठ, कोंडा वगैरे नंतर जमा करणे. २. घालमेल; वर्गावर्गी; उलाढाली; घडामोड.

इस्तरी, इस्त्री स्त्री. १. धुतलेल्या कपड्यांच्या सुरकुत्या काढून त्यास कडकपणा येण्यासाठी त्यावर फिरवण्याचे उपकरण. २. कुंदी करण्याचे यंत्र; एक विद्युत उपकरण. (क्रि. करणे, मारणे).

इस्तरी, इस्त्री स्त्री. बाई; बायको. पहा : **अस्तुरी** : 'मी बी पुरुसराज्यांतून इस्तरीराज्यावर एकदम हापटलों.' – बाय २.

इस्तस्बाब पु. पसंती; सल्ला : 'त्यांचे इस्तस्बाबाने काम करावे' – मइसा ७.५८. [फा. इस्तिस्बाव्]

इस्ताद स्त्री. १. चुन्याचे पक्के बांधकाम : 'इस्तादेंचीं घरें.' – मराआ. २. चीजवस्तू; सामानसुमान; जंगल मालमत्ता. ३. तयारीसाठी पैसा; साहित्य; सिद्धता : 'आंग्र्यांचे अडीचशे माणूस त्यांनी सांगितले त्यासहि इस्ताद मिलत नाहीं.' – पेद १६.१०९. [फा.]

इस्ताफ–फा, इस्तिफा पु. सोडचिठ्ठी;नोकरी सोडण्यासंबंधी वरिष्ठांना सादर केलेले पत्र; त्यागपत्र; राजीनामा : 'आम्हास दौलत नलगे; मक्केस जावें किंवा घरीं बसून राहावें या मागें आम्ही नवाबास इस्ताफाही लिहून पाठविला.' – मइसा. [फा. इस्तिफा]

इस्तारी स्त्री. पत्रावळ; विस्तारी. (व.) [सं. विस्तरण.]

इस्तावा पु . १. नवीन जमीन कीर्दमामुरीस येतेवेळी काही वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षा कमी; परंतु दरसाल वाढत्या साऱ्याने देण्याची पद्धत. २. अशा तऱ्हेने दरसाल वाढणारा सारा. ३. (थट्टेने) नास्ति; अभाव; टाळा. ४. बरोबरी; लढाईची तहकुबी करून बरोबरीच्या नात्याने तहाचे बोलणे करणे. [फा. इस्तिवा]

इस्तियाक मुस्ताकी स्त्री. प्रेम; लोभ : 'ज्या ज्या प्रसंगोचित इस्तियाक–मुस्ताकीच्या गोष्टी बोलावयाच्या त्या नबाब निजामुदोला बहादुर यांनी बयाण केल्या.' – मइसा१.१८७. [फा. इस्तियाक् मुश्ताकी]

इस्तू, इस्तव, इस्तो पु. विस्तव : 'शेंदारानं इस्त्याच्या खांडागत रंग झालेला.' – गोतावळा ३. 'गांज्याच्या डोक्यावर इस्तूव कुठं हाय.' बाय ४.२. (ग्रा.)

इस्तेरेत न. कमी उंचीची साधी खाट. (गो.)

इस्त्री स्त्री. कोळपे दाबून धरण्याची काठी.

इस्दार न. बाहेर काढणे; प्रसिद्धीकरण : 'दस्तक इस्दार करून पाठविलें आहे.' – मइसा ३.९१. [फा.]

इस्ना, इस्ने वि. दोन. पहा : **इसन्ने** [अर.]

इस्पिक पु. १. पत्त्याच्या खेळातील काळा बदाम. २.पत्ते : 'ही इस्पिकाची पिसणी झाली, पण तिच्यात एक्यांचे प्रमाण तसेच राहिले.' – माजी ५५४.

इस्पिट न. खेळावयाचे पत्ते; पत्त्यांचा डाव. पहा : **इस्पिक**

इस्पितळ न. रुग्णालय; रोग्यांची राहण्याची व औषधपाण्याची सोय जेथे असते असे स्थान; (उपरोधाने) वेड्याचे इस्पितळ : 'एखादे राजेश्री जर घरातील सर्व इस्टेट समुद्रात टाकावयास निघाले तर त्याचे आप्तवर्ग त्यांस इस्पितळाचा मार्ग दाखवतील.' –लोटिकेले ४.२२ [इं. हॉस्पिटल]

इस्पिंजर पु. (स्था.) दोन कमानींमधील त्रिकोणाकृती दगड. ज्या दगडापासून कमानीच्या बांधकामास सुरुवात होते. [इं. स्प्रिंजर]

इस्फळ वि. व्रात्य; त्रासदायक; खोडकर. (कु.) [अचपलचा अप]

इस्म पु. नाव. [फा.]

इस्मत स्त्री. शील; पातिव्रत्य; पावित्र्य. [फा.]

इस्माळी बसणे, इस्मून बसणे क्रि. विस्मरणात असणे; विसरून जाणे, बसणे. (माण.) [विस्मरणाचा अप.]

इस्त्राएल, इस्त्रायल पु. १. देवाशी झगडून जय मिळविणारा; याकोबाला देवाने दिलेले नाव. २. याकोबाचे वंशज; ज्यू लोक व त्यांचा धर्म; हे इस्त्रायल लोक याहवे देवतेचे उपासक आहेत. या धर्माचे मूळ उत्पत्ती स्थान पॅलेस्टाईन होय.

इस्त्राव स्त्री. (चर्म. व्यव.) चपलेच्या वरच्या भागाचे नाव; चपलेच्या आंगठ्यास लावलेली पट्टी. (क्रि. ओवणे)

इस्लाम पु. महंमद पैगंबराने स्थापिलेला धर्म; मुसलमानी धर्म; मुसलमान. [फा.]

इस्वण–न पु. कोकण किनाऱ्यावर सापडणारा एक पिवळा मासा.

इस्वाट न. परडे; परसू. [कर.]

इस्वाटा पु. विश्रांती; विसावा; 'म्हंजे बैलांस्नी भरपूर इस्वाटा मिळणार

म्हणा ?' – गोतावळा ४.

इस्वाटी पु.परड्याची रखवाली, राखण करणारा देव. (कर.)

इस्वाळ पु. पहा : **इस्वण**

इह वि. क्रिवि. येथे ; या लोकी; मृत्युलोकी : 'इह भोगिसी कीं पुढतीं.' – गुच ९.३७. [सं.]

इहदे – इहिदे वि. एक; वाहेद. [फा. अहद् = एक]

इह ना पर क्रिवि. इकडे नाही आणि तिकडे नाही.

इहपरलोक पु. मृत्युलोक आणि स्वर्गलोक. [सं.]

इहभोग पु. मृत्युलोकी, पृथ्वीवर भोगावी लागणारी सुखदुःखे : 'अर्थु कामु पसरे । अग्रवर्णे घेती थोरें । तेथ क्षणिकें पदांतरें । इहभोगांचीं । – ज्ञा १५.१५८. [सं.]

इहलोक पु. मृत्युलोक; पृथ्वी. [सं.]

इहलौकिक वि. या लोकातील; पृथ्वीवरील. [सं.]

इहवाद पु. शासन व शासकीय धोरण धर्म व धार्मिक विचार यांवर आधारलेले नसावे असे प्रतिपादन करणारी तत्त्वप्रणाली; धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व व आचरण; सामाजिक नीतिमूल्ये धर्माधिष्ठित न ठेवता ऐहिक जीवनाशी संबंधित असावी असे मानणारे तत्त्वज्ञान. [सं.]

इहवृत्त न. (वर्तमानपत्री) स्थानिक वृत्त, बातम्या. [सं.]

इहसान न. कृपा; प्रसाद; मेहेरबानगी; उपकार :'दौलताबादेचें यश आम्हांस यावें म्हणूनच स्वामींनीं रुपये जहागीर दिली, सर्कारकिफायतीकरिता न दिलें हेंही मोठे इहसान सेवकावर.' – ऐलेख १.३९. [फा.]

इहा स्त्री. इच्छा. [सं. ईहा]

इहामुत्र वि. ऐहिक आणि पारलौकिक : 'इहामुत्रफळापासौनि उपरमें' – ज्ञाप्र ६८९.

इळ पु. वेळ; दिवस. (ग्रा.)[वेळचा अप.]

इळत–द स्त्री. नांगराचा फाळ किंवा फावडे यावरील माती खरडण्याचे साधन; खणते; कंडारण्याच्या शेवटास बसवलेली लोखंडी शिंप – हिने फाळास लागणारी माती खरडून काढतात. (व). वखर किंवा डवर यांच्या फासावरील माती साफ करण्याचे हत्यार. (व.) लाकडी कुदळ्याच्या शेवटास असलेली लोखंडी अणी. (को.)

इळवरी क्रिवि. या वेळपर्यंत; आतापर्यंत; इतका वेळ.

इळंसाट क्रिवि. दिवसभर. (व.)

इळाखिळा पु. १. घरातील हलकी भारी चीजवस्तू; लहान मोठ्या वस्तू; सर्व जंगम मालमत्ता. २. किरकोळ वस्तू; सटरफटर माल. (वा.) **(अंगाचा, शरीराचा) इळाखिळा करणे** – अतिशय श्रम घेणे; फार मेहनत करणे; श्रमणे.

इळानइळ क्रिवि. सारा दिवस; दिवसभर. (नाग.)

इळानिंदा अ. रात्रंदिवस; कोणत्याही क्षणी; केव्हाही; नेहमीः 'इळानिंदा पोटापाय त्यांच्या दारात जावं लागतं.' – तअं १६९.

इळीमिळी गुपचिळी उद्गा. आता चुप, गप बसा; (मुलांनी गप्प बसावे म्हणून घालावयाची शपथ.) पहा : **अळीमिळी गुपचिळी**

इळ्ळ्याचे पात्र न. इडली करण्याचे, उकडण्याचे पात्र, भांडे. (तंजा.)

इक्षु पु. ऊस. [सं.]

इक्षुकांड पु. उसाचे पेर; कांडे; (सामान्यतः) ऊस.

इक्षुजा स्त्री. (रसा.) ऊस आणि बीट यांपासून तयार होणारी साखर. [सं.]

इक्षुदंड–दांडा पु. पहा : **इक्षुकांड** [सं.]

इक्षुयंत्र न. चरक; उसाचा रस काढण्याचे यंत्र. [सं.]

इक्षुरस पु. उसाचा रस : 'नाना प्रभा व्यापें प्रकाशु । गोडिया इक्षुरसु ।' – ज्ञा १८.५०९. [सं.]

इक्षुशर्करा स्त्री. उसापासून तयार केलेली साखर. [सं.]

इंगणे अक्रि. काळजीने, श्रमाने, आजाराने किंवा इतर कारणाने भारावून जाणे; गळून जाणे; दमणे; टेकीला येणे.

इंगरेज पु. इंग्रज; इंग्लिश; ब्रिटिश माणूस; साहेब; गोरा.

इंगरेजी स्त्री. १. इंग्रजी भाषा. २. इंग्रजांचा अम्मल; ब्रिटिश अमदानी. वि. इंग्लिश; इंग्रजांचा; इंग्रजी भाषेसंबंधी; इंग्रजी; ब्रिटिश.

इंगरेजी दारू स्त्री. (इंग्रजी दारू लवकर पेट घेते यावरून) (ल.) १. तापट, चिडका, संतापी माणूस. २. हुषार, चलाख माणूस; तडफदार माणूस.

इंगळ–ळा पु. जिवंत निखारा; विस्तव; अंगार (व.गो.) : 'कैंची सुखनिद्रा आंथरुणीं । इंगळांच्या ।'–ज्ञा ९.५०१.[सं. अंगार](वा.) **इंगळास वळंबे लागणे** – असलेल्या संकटात अधिक भर पडणे; एकादशीच्या घरी शिवरात्र. **इंगळासारखा लाल होणे –** रागाने चेहरा तांबडा होणे; अतिशय संतापणे; **इंगळासारखे डोळे होणे–** अतिशय रागाने डोळे लालबुंद व उग्र होणे.

इंगळा पु. एका जातीचा तांबडा मुंगळा.

इंगळी –ईंगळी स्त्री. १. विंचवाची एक जात; ही आकाराने विंचवापेक्षा मोठी असून काळी व अतिशय विषारी असते. २. ठिणगी; निखारा; विस्तव : 'घालावी ईंगळी ब्रह्मशापाची'– उगी १४.६१. पहा : **इंगळ** : 'जेवीं वेलु वाढवी वेलुजाळी । वेळुवेळवां कांचणीमेळीं । स्वयें पाडूनि इंगळी । समूळ जाळी आपण्यातें ।'– एभा २३.६८९. पहा: **इंगळ** ३. (सोनारी धंदा) तापलेल्या मुशीतील रस ओतण्याकरता वापरावयाचा इंग्रजी साताच्या आकड्यासारखा असलेल चिमटा; सांडशी. (इंगळीच्या नांगीच्या आकारावरून).

इंगा पु. १. (चर्मकार व्यव.) चामडे ओढून घोटून ताणण्याचे व मऊ करण्याचे (उलथण्यासारखे) हत्यार. २. नांगरलेल्या जमिनीतील ढेकळे फोडण्याचे लाकूड. ३. (ल.) हाल. [सं. इंग्] (वा.) **इंगा दाखविणे–** खोड मोडणे; आपले सामर्थ्य दाखविणे. **इंगा फिरणे**– गर्वपरिहार होण्याजोग्या अडचणीत सापडणे; संकटामुळे नरम येणे; जर्जर होणे; त्यामुळे शुद्धीवर येणे; डोळे उघडणे.

इंगाळ पु. पहा : **इंगळ** : 'काशी माझी काळूबाई । तुझं इंगाळ चालायचं ।' – जसा ८२.

इंगित न. १. खूण; सूचक मुद्रा. २. अभिप्राय. ३. अंतस्थ हेतू; रहस्य. ४. (व्यंगितचा अप.) औपरोधिक भाषण; व्यंगोक्ती. [सं.]

इंगित सिद्धांत पु. (भाषा.) मनातील आशय, भावना इ. हावभावांनी

व्यक्त केल्या जातात असे मानणारा सिद्धांत.

इंगितज्ञ वि. इंगित जाणणारा; हावभावावरून अभिप्राय, उद्देश जाणणारा. [सं.]

इंगिताग्र न. इंगितज्ञ : 'पंतप्रधान इंगिताग्र आहेत.'– ऐलेसं ११८३.

इंगुदी स्त्री. (आयु.) हिंगणबेट. [सं.]

इंगुळ पु. निखारा. पहा : **इंगळ** : 'रुसले भरतारा । नाहीं म्हणावा आपला । शेजीच्या लावणीनं । लाल इंगुळ तापला ।'– वलो ९१. (व.)

इंगूळ पु. पारा व गंधक यांचे मिश्रण. पहा : **हिंगुल** : 'इंगुळ व कापूर जाळून त्याजपासून धरलेले काजळ...'–ननाना १६.

इंग्रज, इंग्रेज पु. १. पहा : **इंगरेज** : 'जाबी जंगी फिरंगी । इंग्रेज बहुधा रक्त रंगी । मलेबार नौका मार्गी । विघ्नकर्ते दंडिले ।'– मुसभा ८.१२७. २. दोन फाशांनी व चार रंगांच्या सोंगट्यांनी खेळण्याचा एक डाव. यात पेशवे (पिवळ्या) आपल्या शिंदे (हिरव्या), होळकर (काळ्या) साथीदारांसह एका बाजूला व इंग्रज (तांबड्या) दुसऱ्या बाजूला असून इंग्रजांना इतरांनी हरविले म्हणजे 'इंग्रजांची टिमकी बजावली' असा टोमणा मारून डाव संपतो. (कों.)
न. १. इंग्लिश माणूस; इंग्लंडमध्ये राहणारे गोरे लोक. २. पोलाद; लोखंडाचा एक प्रकार.

इंग्रजी, इंग्रेजी वि. पहा : **इंगरेजी.**

इंग्रजी गहाण न. (कायदा) जेथे धनकोला मिळकत गहाण करून देऊन ऋणको ठरावीक मुदतीत कर्ज फेडण्याचा करार करतो, व स्वत: कर्ज फेडल्यास मिळकत धनकोने परत करावी असे लिहून देतो अशा व्यवहारास इंग्रजी गहाण म्हणतात.

इंग्लिश वि. १. पहा : **इंगरेज, इंगरेजी.** २. परदेशी; विलायती; इंग्लडदेशीचा.
न. इंग्रजी भाषा. [इं.]

इंग्लिश बॉडी स्त्री. (छाप.) एक प्रकारचा छापण्याचा, चौदा पॉईंटचा टाईप. हा पायका टाईपपेक्षा जरा मोठा व ग्रेट प्रायमरपेक्षा जरा लहान अक्षरांचा असतो. [इं.]

इंच पु. फुटाचा बारावा भाग; अडीच सेंटीमीटर; अंगुळ; तसू. [इं.]

इंजनवारा पु. पंखा; पंख्याचा वारा. (व.)

इंजाई वि. दिसण्यात सुरेख; चकाकणारे; भपकेदार; दिखाऊ पण पोकळ.

इंजाईत वि. नुकसान, लुसकान; दिखाऊ (कापड) ; कमजोर, नि:सत्त्व, ठिसूळ (लाकूड, इमारत इ.); चांगले न बनवलेले, तयार न केलेले (काम इ.)

इंजानिब पु. मी; आम्ही : 'इंजानिबास कौन्सिलातून फर्माविलें.'– विंचूइ.

इंजिन शक्ती उत्पन्न करणारे यंत्र; गतियंत्र. [इ.]

इंजिन दंड (यंअ.) पुलीला (कप्पीला) आधारभूत असलेला व स्वत:भोवती फिरून शक्ती किंवा गती प्रक्षेपित करणारा इंजिनाचा मोठा दांडा.

इंजिनियर, इंजिनेर पु. यंत्रकाम किंवा बांधकाम जाणणारा; स्थापत्यशास्त्रज्ञ; यंत्रशास्त्रवेत्ता; अभियंता. [इं.]

इंजिनियरिंग न. वास्तुशिल्प; स्थापत्यशास्त्र; यंत्रशास्त्र; अभियंत्याचे काम. [इं.]

इंजेक्शन न. १. लस, औषधीद्रव्य इ. पिचकारीने शरीरात घालणे, सोडणे. (क्रि. देणे, करणे); अंत:क्षेपण; सूचिभेदन; सुईटोचणी. २. बस्तिविधी.

इंझणा पु. पहा : **विंझणा** (व.)

इंझाळ पु. १. पाटाच्या खालच्या बाजूस लावलेला आडवा दांडा; पाय. (व.) पहा : **अडात.** २. कवाडाला लावलेला आडवा दांडा. पहा : **इंडाळे**

इंटाळ, इंठाळ पु. पहा : **विटाळ** : 'आमाचा इंटाळ झाला.'– के १.७.३०. (व.)

इंड स्त्री. मासे पकडण्याचे लांबट चौकोनी जाळे. (कु.)

इंडाळे न. कवाडाच्या चौकटीमधील आडवे लाकूड. (व.)

इंडिकेट स्त्री. राष्ट्रीय काँग्रेसमधील, इंदिरा गांधींना पाठिंबा देणारा गट : 'सिंडिकेटशी सामना देण्यासाठी 'इंडिकेट'तयार झाली होती.'– अदिल्ली ७९.

इंडियन वि. हिंदुस्थानासंबधी.
पु. १. हिंदी माणूस; हिंदुस्थानचा रहिवासी. २. अमेरिकेतील मूळचे रहिवासी; रेड इंडियन. [इं.]

इंतकाल पु. मृत्यु; अंतकाल : 'महमदअलीखान वालाजाह यांचा इंतकाल छ. २७ माहे रबिलावली जाल्याचें वर्तमान आहे.'– मइसा ५.२०३. [फा.]

इंतजाम पु. बंदोबस्त; व्यवस्था : 'सर्कारचे कामाचा पक्का इंतजाम.'– जोरा १२९. [फा]

इंतजारी स्त्री. मार्गप्रतीक्षा; वाट पाहणे; उत्सुकता : 'त्याचा जबाब केव्हा येईल याची इंतजारी आहे.'– मइसा ५.१२८.
वि. मार्गप्रतीक्षक; उत्सुक : 'उत्तराविषयीं लवकर आज्ञा जाली पाहिजे; नबाब फार इंतजारी आहेत.' भमइसा ५.१२४. [फा.]

इंताजी वि. मिजासखोर; फार नाजूक; चवंढाळ; चोखंदळ. (व.)

इंतिजार पु. वाट पाहणे; प्रतीक्षा : 'हुजुरच्या सालजाबाकरिता इंतिजार होते.' – हिंदख१.४७. [फा.]

इंत्रुज न. खिस्ती लोकांचा शिमगा. (गो.) [पोर्तु.]

इंदळस, इंदळसकुटा वि. भोळसट. (कु.)

इंदिरा स्त्री. लक्ष्मी; विष्णुपत्नी; कमला : 'जे होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें ।'– नल ९. [सं.]

इंदी(दि)वर न. कमळ; नीलकमल; निळ्या कमळाचे फूल : 'फांकलिया इंदीवरा । परिवारु नाहीं धनुर्धरा ।'– ज्ञा १३.३६२. [सं.]

इंदुरी वि. इंदूर (शहरा) मध्ये तयार होणारी (साडी, वस्त्रे इ.).

इंदुवदना वि. १. चंद्राप्रमाणे जिचे मुख आहे अशी (स्त्री). २. (ल.) सुंदर, रूपवती स्त्री; तरुणी; कुमारी. ३. एक समवृत्त. यात १४ अक्षरे येतात. उदा. 'कायकरि काळकलि नीलगल चित्तीं ।' [सं.]

इंदुवार–वासर पु. सोमवार. [सं.]

इंदु-दू पु. चंद्र : 'जो मम नयनचकोरा इंदू.'- रारावि ५७. सामा. शब्द- मुखेंदू, पूर्णेंदू इ. [सं.]

इंद्र पु. १. देवांचा राजा; स्वर्गलोकाचा व पूर्व दिशेचा अधिपती. ही मेघ, पाऊस यांची अधिष्ठात्री देवता म्हणून फार प्राचीन काळापासून मानतात : ' श्रिया वाखाणिजे अमरेंद्र । कृष्ण इंद्राचाहि इंद्र ।'-एरुस्व १.७८. २. (समुदायामध्ये) राजा; श्रेष्ठ, वरिष्ठ व्यक्ती; नायक; मुख्य; पुढारी; सामा. शब्द- नरेंद्र, नृपेंद्र, खगेंद्र, फणींद्र. ३. गोसावी, संन्यासी यांच्यातील एक पंथ; या पंथातील व्यक्ती. [सं.]

इंद्रकट न. आढ्यापासून पाख्यापर्यंतचे खाली आलेले वासे टेकून राहण्यासाठी तुळयांच्या टोकांवर बसवलेले आडवे लाकूड; भिंतीत बसवलेले बहालाच्या खालचे आडवे लाकूड. (कों.) [सं.]

इंद्रकल्याणी वि. विद्रूप; कुरूप. (माण.)

इंद्रकापशी स्त्री. कापसाच्या झाडाची एक जात. देवकापूस. [सं.]

इंद्रकीट पु. एक प्रकारचा पावसाळी तांबडा (कधी पांढरा) किडा; कुंकवाचा किडा; सोमकिडा; हा मृगनक्षत्रात उत्पन्न होतो, याच्या पाठीवर सहा ठिपके असतात.

इंद्रकील १. मंदराचल. २. घोट्याचा सांधा; घोट्याची खीळ.[सं.]

इंद्रगेळ न. १. पायाच्या घोट्याचा भाग. २. गुराच्या टाचेवर (खुरावर) मागील बाजूस वाढलेला मांसल भाग; पायाचा एक भाग.

इंद्रगोप पु. पहा : **इंद्रकीट** : 'इंद्रगोप धुतले पाउसें । पद्मरागीं जडत्व असे ।'- ऋ ८६.

इंद्रचाप पु. इंद्रधनुष्य; पावसाच्या तुषारांवर पडणाऱ्या सूर्यकिरणांच्या योगाने आकाशात दिसणारी धनुष्याकृती. याचा आकार अर्धवर्तुळाकार असून वर्तुळाचा मध्यबिंदू पाहणारा आणि सूर्य यांस जोडणाऱ्या रेषेवर असतो. यात तांबडा, नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा व जांभळा असे सात रंग असतात. पावसाच्या पाण्याच्या थेंबामध्ये होणारे प्रकाशकिरणांचे वक्रीभवन व परावर्तन यामुळे इंद्रधनुष्य पडते. [सं.]

इंद्रजव पु. इंद्रबीज; कुड्याचे बी. [सं. इंद्र+यव]

इंद्रजाल न. नजरबंदी; मंत्रविद्या, जादूगिरी; जादूटोणा; गौडबंगाल; भानामती; हातचलाखी; माया : 'हें सर्व इंद्रजालच माझ्या दृष्टीस पडत आहे.'- कमं ३. [सं.]

इंद्रज्योत स्त्री. पहा : **इंद्रजव**

इंद्रधना पु. इंद्रधनुष्य : 'तिला आपला सावूट पाण्यात दिसला. जणू इंद्रधनाच.'- आपा ४३.

इंद्रधनुख-धनु न. पहा : **इंद्रचाप** : 'नाना रंगीं गजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे ।'- ज्ञा १५.२४०. [सं.]

इंद्रध्वज पु. पाडव्याच्या दिवशी उभारतात ती गुढी. पहा : **गुढी**[सं.]

इंद्रनील-ळ पु. एक रत्न; उंची मौल्यवान नीळ : 'पिळून इंद्रनील किळी । वोतली कृष्णतनु सांवळी । पाउलें सुकुमार कोंवळी । घोटीं निळीं दोहीं भागीं ।'- एरुस्व ६.२३. [सं.]

इंद्रफणी पु. १. इंद्रजाल विद्येने दोरीचा दिसणारा साप. २. इंद्र व शेष. ३. मांजर व सर्प : 'दोघां ऐसीं तीन चालती । अवगुणी अष्टधा प्रकृती । अधोर्ध सांडून वर्तती । इंद्रफणी एसीं ।'- दास १५.५.१. [सं.]

इंद्रबस्ती स्त्री. (आयु.) पोटरीत घोट्यापासून १२ बोटावर असणारे मर्म.

इंद्रबाही स्त्री. दरवाज्याच्या फळीचे दोन बाजूचे दोन व मधला एक असे उभे तुकडे. [सं. इंद्र+बाहु]

इंद्रभुवन न. १. इंद्राचा राजवाडा; इंद्रलोक. २. (ल.) अतिशय सुंदर, वैभवशाली व टोलेजंग राजवाडा. [सं.]

इंद्रमडे-ढे न. अगदी कृश, अशक्त, रोड, मढ्यासारखा मनुष्य.

इंद्रलोक पु. स्वर्गातील इंद्राची निवासभूमी; स्वर्गाच्या ज्या भागात इंद्र राहतो तो प्रदेश. [सं.]

इंद्रवज्रा स्त्री. एक समवृत्त; याच्या प्रत्येक चरणात ११ अक्षरे येतात. उदा. 'कां टाकिलें शस्त्र रणांत तेणें ।'- वेसं. [सं.]

इंद्रवणी न. पाणी : 'वाइ भोजेयालागि इंद्रवणी ठेवा.'- लीचउ ८.

इंद्रवशा स्त्री. एक समवृत्त. प्रत्येक चरणात १२ अक्षरे. उदा. 'गोपी हरीच्या भजनात रंगल्या.' [सं.]

इंद्रवारुण-णी-वरुण न. कडूकवंडळ; इंद्रवारुणीचे फळ; कडूवृंदावन. : 'अंतर कडू वरी वरी दावी सुंदर । इंद्रवारुणफळ जैसें ।' [सं.]

इंद्रश्री स्त्री. स्वर्गीय थाट; इंद्रलोकातले वैभव : 'तैसीं खवळें चाड । होय दु:खासकट गोड । इंद्रश्रीहि सांकड । गमो लागे ।।'-ज्ञा १४.१६३.

इंद्रसभा स्त्री. १. इंद्राची सभा; इंद्राचा दरबार. २. (ल. विशेषत: रात्रीच्या) जेवणाला टाळा : 'तुम्ही पडला पक्के कोकणस्थ, परान्नं पुष्टिवर्धनं, लागलीच रात्रीची इंद्रसभा.'- खरादे १२२.

इंद्राची रंभा स्त्री. इंद्राच्या सभेतील अप्सरांमध्ये रंभा सर्वात सुंदर, यावरून (ल.) सुंदर स्त्री. : 'पैसा मिळाला की इंद्राची रंभा देखील आणून देईन.'- मोर २२.

इंद्राठी पहा : **इंद्रकट** (कों.)

इंद्राणी स्त्री. १. इंद्राची स्त्री, पत्नी; शची. इंद्रपदावर कोणीही आला तरी इंद्राणी बदलत नाही. ती तीच राहाते यावरून बदलणाऱ्या गोष्टींमध्ये एखादी कायम राहत असेल तर त्याबद्दल म्हणतात. २. निर्गुडी. ३. इंद्रवल्लरी किंवा कडू कवंडली (इंद्रवारुणी). ४. वेलदोड्याचे झुडूप.[सं.]

इंद्रायण न. कडू वृंदावन; कवंडल-ळ. [सं.]

इंद्रायणी स्त्री. इंद्राची स्त्री. पहा : **इंद्राणी** : 'इंद्रास इंद्रायणी, कृष्णास हो रुक्मिणी ।'- वसा १५. २. पुणे जिल्ह्यातील एका नदीचे नाव. प्रसिद्ध आळंदी क्षेत्र हिच्या काठावर आहे.

इंद्रायुध न. पहा : **इंद्रचाप**

इंद्रायेण न. पहा : **इंद्रावण-न** (वा.) **इंद्रायेण फलवत् स्नेह**-वरून दिसावयास मैत्री पण आतून वैर; कपटमैत्री; भोंदूपणाचा स्नेह:'तेहि देवहत बुद्धिहत जाले आहेत. सिंद्यासी इंद्रायेण फलवत स्नेह होता. अलिकडे बहुतच विटले आहे.'- पेद ३६.३८५.

इंद्रावण-न न. वृंदावन; कडू कवंडळ. हे फळ दिसण्यास सुंदर पण चवीला कडू असते. यावरून सुंदर पण निरुपयोगी, बाहेरून शांत पण आतून क्रूर अशा माणसाला म्हणतात : 'तें इंद्रावण कोणी न सेवी ।

अंतरस्वभावीं अति मळिण ।'– एभा २.३९०. [सं.]

इंद्रावणी स्त्री. एक वेल; कडू वृंदावन; हिची पाने कलिंगडाच्या वेलीसारखी पण त्यापेक्षा थोडी बारीक असतात. पिकलेले फळ पिवळे दिसते. यापैकी एका जातीचे फळ मोठ्या आंब्याएवढे असते. त्याला घोडइंद्रावण म्हणतात. दुसऱ्या जातीचे फळ लिंबाएवढे असते : 'मग राजसा जिया क्रिया । तया इंद्रावणी पिकलिया जे सुखें चितारूनियां । फळती दुःखें ।।'– ज्ञा १४.२६२. (वा.) **इंद्रावणीचे फळ–** सुंदर पण निरुपयोगी माणूस, पदार्थ. [सं. इंद्रवारुणी]

इंद्राक्ष पु. १. घोड्याचे एक लक्षण. ज्याच्या दोन्ही गंडस्थळी भोवरे आहेत असा घोडा; ज्यास कर्णमूळाच्या ठिकाणी एक व उरावर एक असे दोन भोवरे असतात त्यासही इंद्राक्ष म्हणतात.– अश्वप.[सं.]

इंद्रिय न. १. शरीराचे विशिष्ट कार्य करणाऱ्या किंवा बाह्य जगाचा वेगवेगळ्या प्रकारे अनुभव घेणाऱ्या शरीराच्या भागांपैकी प्रत्येक. अवयव; गात्र; ज्ञानाचे, कर्माचे साधन असलेला शरीराचा भाग. एकूण इंद्रिये अकरा. पाच ज्ञानेंद्रियें, पाच कर्मेंद्रिये व मन : 'अकराही इंद्रियवृत्ती । कैशा लागती भगवद्भक्ती ।'– एभा २.२९३. २. पुरुषांचे जननेंद्रिय.[सं.] (वा.) **इंद्रिय हाती धरणे**– जार कर्माचे अतिशय व्यसन असणे; अति विषयासक्त असणे; उन्मत्त होणे.

इंद्रियकदंब पु. इंद्रियांचा समुदाय असा देह : 'मग तो इंद्रियकदंबु । करविजे तंव राबू ।'–ज्ञा १८.५०२.

इंद्रियगम्य–गोचर– ग्राह्य वि. इंद्रियांना आकलन होणारे, कळणारे, जाणवणारे; इंद्रियांना ग्रहण करता येण्याजोगा. 'वास्तवाचाच कल्पनाजन्य व इंद्रियगोच असा अवतार आहे.'– ॲका २७.[सं.]

इंद्रियग्राम पु. १. इंद्रियसमूह; सर्व इंद्रिये. २. इंद्रियांचे स्थान. [सं.]

इंद्रियजन्य वि. इंद्रियोद्भव : इंद्रियापासून झालेले. [सं.]

इंद्रियजुलाब पु. १. मूत्रेच; मूत्रढाळ; मूत्राधिक्य होण्याचे औषध. २. बहुमूत्र; मूत्रवृद्धी.

इंद्रियदमन न. १. इंद्रियांना कह्यात, स्वाधीन ठेवणे; मनोविकार दाबणे, दडपणे. २. विषयाकडे असलेला इंद्रियांचा ओढा नाहीसा करण्याचे योगसाधनादी उपाय. [सं.]

इंद्रियद्रव्य न. इंद्रियरूप द्रव्य (कोणी आत्मसंयमरूप अग्नीमध्ये ते कायिक, वाचिक व मानसिक या तीन युक्तिमंत्रांनी पवित्र अशा या इंद्रियरूप द्रव्याचे हवन करतात.) : 'एक संयमाग्नि होत्री । ते युक्तित्रयाच्या मंत्रीं । यजन करिती पवित्रीं । इंद्रियद्रव्यीं ।।' – ज्ञा ४.१२६.[सं.]

इंद्रियनिग्रह पु. विषयवासनेवर ताबा ठेवणे; कामविकार कह्यात ठेवणे; संयम; ब्रह्मचर्य. [सं.]

इंद्रियपीठ न. इंद्रियांचे स्थान, ठिकाण : 'म्हणौनि चक्षुरादिकिं दाहें । इंद्रियपीठीं सानुग्रहें ।'– राज्ञा १८.३४८. [सं.]

इंद्रियप्रौढी स्त्री. इंद्रियांचे सामर्थ्य : 'तैसी सर्ववृत्तिवैभवीं ।' बुद्धिचि एकली बरवी । बुद्धीही बरव नवी । इंद्रियप्रौढी ।।'– राज्ञा १८.३४६.

इंद्रियमद पु. इंद्रियांचे स्वैर वर्तन; उन्मत्तपणा : 'कां जालिया सकळ संपदा । जो अनुसरैल इंद्रियमदा ।'– ज्ञा ३.१०३. [सं.]

इंद्रियवर्ग पु. विविध इंद्रिये : 'इंद्रियवर्गीं दाखविलिया । विरुद्धा अथवा भलीया ।– ज्ञा १६.७८. [सं.]

इंद्रियविज्ञानशास्त्र शास्त्र न. इंद्रियांच्या रचनेची, व्यापारांची माहिती देणारे शास्त्र. [सं.]

इंद्रियषट्पदाचारी वि. पाच ज्ञानेंद्रिये व मन अशा सहा इंद्रियरूपी पायांचा (जीवभ्रमर) : 'वेद्योदकाच्या सरोवरीं । फाकता विषयकल्हारीं । इंद्रियषट्पदाचारी । जीवभ्रमरातें ।।'–ज्ञा १८.१३०१ [सं.]

इंद्रियागम्य वि. इंद्रियांना आकलन न होणारे; इंद्रियागोचर; इंद्रियातीत; न जाणवणारे; आकलनाच्या पलीकडचे. [सं.]

इंद्रियार्थ पु. इंद्रियाचा विषय (रूप, रस, गंध स्पर्श, शब्द यांपैकी प्रत्येक विषय : 'जो या इंद्रियार्था । नागवेचि ।'– ज्ञा २.१२४. [सं.]

इंद्रियीकरण न. (जीव.) इंद्रियरचना; इंद्रियविशिष्टता. [सं.]

इंद्रुसयारी स्त्री. (नाविक.) गलबतावरील डोलकाठी व शीड उभारण्याची दोरी; यारी.

इंधक पु. (भौ.) इध्र.

इंधन न. १. सर्पण; जळण; जाळावयाची लाकडे; बेतण : 'जरि अमृत घालुं आंधणा । कापुर मेळउ इंधना :'– ऋ ५१. (ग्रा.) [सं.]

इंधन पंप (यंत्र) पु. १. द्रव इंधन कार्ब्युरेटरकडे ढकलणारा, मोटारगाडीमध्ये बसविलेला पंप. २. इंधन फेकणारा पंप.

इंधनबदल पु. (विअ.) इंधनातील स्थित्यंतर, चढउतार, अंशात्मक बदल.

इंधनभरण न. (स्था.) पेटवण. [सं.]

इंधा पु. प्रसूतीनंतर पुन्हा मासिकपाळी सुरू होण्यापूर्वीच गर्भधारणा होऊन झालेला मुलगा. (व.)

इंधा पु. चुलीसाठी मांडावयाच्या तीन धोंड्यांपैकी प्रत्येक. (व.)

ई

['ई' ने सुरू होणारे काही शब्द येथे न आढळल्यास 'इ', 'वी', 'यी' मध्ये पाहावेत.]

ई. मराठी वर्णमालेतील चौथा वर्ण व स्वरमालेतील चौथा स्वर. स्थानपरत्वे ऱ्हस्व किंवा दीर्घ : 'सीता, भीरू इ. मध्ये ऱ्हस्व; शीत, मती इ.मध्ये दीर्घ.

ई सना. ही 'निंदा सकळ पापांचे माथा । ई परता असेना ।'– एभा ९.५०३.

ई (ई ऽऽऽ) उद्गा. किळस, भीती, उपहास, थट्टा इ. दर्शवणारा शब्द. साधारणत: कंठावरोधयुक्त व अतिदीर्घ. विशेषत: बायकी उद्गार.

ई संक्षेप. बहुमानार्थक (शब्दाच्या शेवटी, आई या शब्दाचा संक्षेप. उदा. ताराई, जिजाई, मंगळाई इ.)

ई (व्या.) भावदर्शक प्रत्यय. (हा नामास, विशेषणास लावला असता तद्भावदर्शक भाववाचक नामे होतात. उदा. खूष–खुषी, गरीब–गरिबी, एक–एकी.) [फा.]

ई सना. हा, ही, हे (पूर्वीच्या काळी दरबारी पत्रात लेखक स्वत:बद्दल हे

संबोधन योजीत असे : 'ई जनाब') [फा. ईन्.]

ईकुणाणोव वि. एकुणनव्वद : 'आणी सारा तेयाची अंतउरी । ईकुणाणोविची – क्रिपु ९.१.

ईचा पु. संशय. [सं. वीचि= चंचलता.]

ईट न. भाल्यासारखे एक हत्यार. पहा : **इटा** [ते. ईटे]

ईटबंदी वि. विटांनी बांधलेले–ली (घर,भिंत).

ईड अ. बरोबर; समान; बद्दल; ऐवजी : 'वरकडास अर्धा मुलुकाचा महसूल ईड करून दिले.' – मऐशि १०२.४ [तंजा] [त. ईडु]

ईडनिंबू–लिंबू न. गधड लिंबू.

ईडनिंबू–लिंबू न. गधड लिंबू; लिंबाच्या जातीतले परंतु थोडे मोठे, आंबट फळ; याचा रंग पिवळा असून साल खडबडीत असते. याचे लोणचे घालतात. रसाचे लेमोनेड करतात. [का. ईळे]

ईडपीड पहा : **इडापिडा**

ईड येणे क्रि. पुरवणे; रेलचेल होणे.[का. इडिकू = दाटणे, घट्ट बसणे]

ईडा पहा **: इडा** : 'मेरू शिखर केवि न फोडी । ईडा पींगळाते' – उगी १७ (९) १.

ईडेपाडे क्रिवि. नेटाने; चढाओढीने; ईर्षेने. पहा : **इडेपाडे** : 'दोही दळीचे ईडेपाडें । द्याकर मांडिला चढेंचढें ।' – वेसीस्व ११.७२[ईड चे द्वि.]

ईडेपिडे घेणे क्रि. (बोटे मोडून) दृष्ट काढणे. पहा : **इडापिडा** : 'किती घेती ईडपिडे.'– वेसीस्व २.१४.

ईड्य वि. स्तुत्य; स्तुती करण्याजोगा : 'सद्गुणमंडित पंडित दंडि तपस्वीड्य । सद्विवेकपिता ।' – मोसभा ४.५७. [सं. ईड्]

ईण–न स्त्री. विहीण. (कर.) [विहीण अप.]

ईत, ईती स्त्री. अतिवृष्टी, अनावृष्टी, उंदीर, टोळ, पोपट, स्वचक्र, परचक्र या सात प्रकारांनी होणारा उपद्रव. [सं. ईति =उपद्रव]

ईतवार पु.आदितवार; रविवार. (खा.)

ईथर पु. १. पृथ्वीभोवती असलेले वायुरूप पदार्थांचे सर्वव्यापी वेष्टन; इंधक; आकाशतत्त्व; आकाशातील सर्व रिक्त स्थळास व्यापून टाकणारा तेजोवाहक पदार्थ. सूक्ष्म वायू. २. (रसा.) अल्कोहोलमधील हैड्रॉक्सिल गणातील हैड्रोजनच्या जागी अत्किल किंवा ॲरिल गण समाविष्ट झाल्याने बनलेले संयुग.

ईद स्त्री. मुसलमानी सण. ईदीचे दोन मुख्य सण आहेत. बकर ईद आणि रमजान ईद. रोजे–उपवास सोडण्याचा सण : 'नबाबास ईदेबद्दल वस्त्रे पावली नव्हती.'– दिमरा १.१६१. [फा.]

ईदगा पु. मुसलमान धर्मीयांचे प्रार्थनास्थान : 'मुसलमान... ईदग्यात नमाज पढण्यासाठी मिरवणुकीने जात.'– जीसे ३५२.

ईदृश वि. अशा प्रकारचा; असला. [सं.]

ईन मीन तीन, ईन मीन सवा–साडे तीन संख्येने अगदी कमी (माणसे); अगदी अल्प; थोडी संख्या (वस्तू, माणसे इ.) : 'या संस्थेच्या इन मीन तीन सभासदांपैकी दोघे बाहेर जाणार...' –सुदे २६२.

ईप्सा स्त्री. इच्छा. [सं.]

ईप्सिणे सक्रि. इच्छिणे : 'तैसें शतक्रतु यजिलें मातें । कीं ईप्सितातिस्वर्गसुखांतें ।'– ज्ञा ९.३१२. [सं. ईप्सा]

ईप्सित वि. इच्छिलेले; हवे असलेले : 'भोजाचे पुरवून ईप्सित मुनी तो होय अंतर्हित ।' – विक (भोज) १९.

ई–फल न. (ग.) $(१ + \frac{१}{क्ष})^{क्ष}$ या राशीची किंमत; क्षची किंमत (१, २, ३... अशा क्रमाने) अनंतापर्यंत वाढवत नेल्यास, ज्या अंतिम किंमतीच्या जवळ जाते ती किंमत.

ईर वि. जिच्या अंगात आले आहे अशी व्यक्ती : 'ईर तो टोणा फिरवीत चौफेर नाचू लागला.' –बारी १२१.[सं. वीर] (वा.) (अंगात) **ईर शिरणे**– बेभान होणे; स्वत:वरचा ताबा सुटणे : 'अंगात एक ईर शिरावा तसं त्यांनी भिमाचं कचाऽचा कुडकंच केलं.'– चिताक ८३.

ईर स्त्री. १. शक्ती, उत्साह; सामर्थ्य; तरतरी. २. सत्त्व; उत्कृष्टपणा; पक्केपणा व गुणक्षमता यांचा समावेश ज्यात आहेत असे (चुना, पीठ इ.) तत्त्व. पहा : **विरी** [सं. वीर्य]

ईर स्त्री. १. चढाओढ; स्पर्धा; चुरस. २. हरकत; अडथळा; तंटा (क्रि. धरणे, येणे). ३. बुद्धिबळात आपल्या राजास दुसऱ्याच्या मोहऱ्याचा बसणारा शह लागू पडू नये म्हणून आपले मोहरे/प्यादे मध्ये घालणे. (वा.) **ईर येणे–** अडथळा करणे; अडवणूक करणे. **ईरेस घालणे**– स्वत:च्या बचावास दुसऱ्यास पुढे करणे, धोक्यात घालणे. किल्ल्याचा दरवाजा फोडताना त्याला असलेले लांब लांब खिळे हत्तीच्या धडकेबरोबर त्याच्या कपाळात शिरू नयेत म्हणून मध्ये रोडकासा उंट घालणे. **ईरेस पडणे, चढणे**–चुरशीने, अभिमानाने पुढे सरसावणे; कंबर कसून कार्यास, लढण्यास उद्युक्त होणे : 'मोहरे मोहरे इरेसी पडती.'– सप्र २१.५१. **ईरेस पडणे, सापडणे**– धोक्यात, गोत्यात सापडणे; कठीण प्रसंगात सापडणे.

ईरकामणे क्रि. रक्कम लिहिणे : 'खुशनुदी ईरकाम करीत गेले पाहिजे.'– आंपव्य ५७. [फा. रकम]

ईरतवान हिंमतवान; ईर्षावान. (माण.) [सं. ईर]

ईरतीने वागणे क्रि. हिंमतीने वागणे. (माण.)

ईरपीर वि. अफाट, उद्योगी, धाडसी मनुष्य : 'हें पहा मिस् विलायत, मोठेमोठे ईरपीर हा गुंतागुंतीचा प्रश्न सोडवितां सोडवितां थकले.'– सुदर्शन ६५. [सं. वीरचा अप.]

ईरेसरी स्त्री. १. जिद्द; ईर्षा. २. वीरश्री. २. वरचढपणा.

ईर्षा, ईर्ष्या स्त्री. १. हेवा; मत्सर. २. चुरस; स्पर्धा; चढाओढ. ३. संकल्पित कार्य तडीस नेण्याविषयी अंगी असणारा अभिनिवेश, उत्साह, अभिमान; पहा : **ईर** (क्रि. धरणे, येणे) (वा.) **ईर्षा देणे–** एखाद्यास उत्तेजन देणे; उचलून धरणे; चढविणे. [सं. ईर्ष्या]

ईर्षाद स्त्री. इच्छा; अनुमती; आज्ञा; इरादा; संमती; हेतू : 'रावजीकडून राव पंतप्रधान यांस व मदारूल महाम यांस पत्रें लिहावावी व आमचेतर्फेनहि ल्याहावें म्हणोन ईर्षाद केली.'– मइसा ७.१९४. [फा.]

ईर्ष्यालु–लू वि. (विरू.) ईर्ष्यालू. १. ईर्ष्या बाळगणारा; उत्साही; वीरश्रीने युक्त. २. हेवेखोर; मत्सरी. [सं.]

ईव पु. पाठीच्या कण्याच्या दोन्ही बाजूचे मानेपासून कमरेपर्यंतचे फुगवटे; पाठीच्या सरांपैकी प्रत्येक. (व.) २. पाठीच्या या भागात येणारी.

ईश पु. १. ईश्वर २. राजा; मालक; धनी; सम्राट; अधिपती. सामा. शब्द- जगदीश, महेश, दिनेश इ. : 'जो प्रकाश्येवीण प्रकाशु । जो ईशितव्येवीण ईशु ।' – ज्ञा १५.५४६. [सं.]

ईशान पु. १.मालक; धनी; राजा. २. शंकर : 'राज्य त्यजिलें ईशानें । गुंति जाणोनि स्मशानें । वासु केला ।'–ज्ञा१३.२४. [सं.]

ईशानी–न्य स्त्री. उत्तर व पूर्व या दिशांच्या मधली उपदिशा; ईशान्य दिशा. [सं. ईश्, ऐशानी]

ईशितव्य न. ज्यावर स्वामित्व गाजवायचे आहे अशी वस्तू : 'जो ईशितव्येविण ईशु ।'– ज्ञा १५.५४६.

ईशिता स्त्री. १. प्रभुत्व; वर्चस्व. २. शंकराच्या आठ स्वरूपांपैकी एक; अष्टमहासिद्धींपैकी एक.

ईश्वर पु. १. परमेश्वर; जगाचा नियंता; देव. २. शंकर किंवा विष्णू; शंकराचे स्थान – रामेश्वर, ब्रह्मेश्वर. ३. स्वामी; राजा; सत्ताधीश; अधिराज. ४. अवाढव्यपणा, विशालता दर्शविण्यासाठी हा शब्द सामासिक शब्दात सढळपणे उपयोजतात. जसे– डोंगरेश्वर, धोंडेश्वर, खांबेश्वर, वाडेश्वर, पाटेश्वर, नदीश्वर, फुलेश्वर. ५. सर्वश्रेष्ठ या अर्थी शब्दाच्या शेवटी लावतात. जसे– कवीश्वर, योगीश्वर : 'तोचि भरंवसेनिसी । योगीश्वरु' – ज्ञा ६.४७. [सं.]

ईश्वरकर्तृत्व, कृति न. स्त्री. दैवी कृती; ईश्वराची करणी.[सं.]

ईश्वरकृपा स्त्री. परमेश्वराची कृपा; ईश्वरी कृपा; ईश्वरीप्रसाद.

ईश्वरतनुचतुष्टय ब्रह्मांडाची चार अंगे – महामाया, अव्याकृती, हिरण्यगर्भ व विराट.

ईश्वरदत्त वि. ईश्वराने दिलेले; दैवी. (ल.) उपजत; निसर्गदत्त.[सं.]

ईश्वरदत्तभूमि–मी स्त्री. परमेश्वराने दिलेला देश; परमेश्वरप्राप्त प्रदेश : 'यहुद्यांना पॅलेस्टाईन ही ईश्वरदत्तभूमि वाटते.'– ज्ञाको ३६०.

ईश्वरनियमित वि. ईश्वराने योजलेले, ठरवलेले.

ईश्वरप्रणिधान न. ईश्वराची आराधना. [सं.]

ईश्वरप्रणीतता स्त्री. अपौरुषेयत्व; मनुष्यनिर्मित नसलेली; ज्यांचे कर्तृत्व मनुष्याकडे देता येत नाही अशा बाबी ईश्वरप्रणीत आहेत असे मानतात.

ईश्वरप्रसाद पु. देवाची कृपा; ईश्वरकृपा. [सं.]

ईश्वरप्रीति–ती स्त्री. १. ईश्वराची मर्जी, प्रसन्नता. २. देवाची कृपा; ईश्वरीकृपा. ३. ईश्वराबद्दलचा जिव्हाळा, भावभक्ती. [सं.]

ईश्वरप्रीत्यर्थ क्रिवि. देवास आवडीचे म्हणून; देवास प्रसन्न करण्यासाठी; देवासाठी (दिलेले).

ईश्वरभक्ति–क्ती स्त्री. ईश्वराची पूजा, उपासना, आराधना इ. [सं.]

ईश्वरभाव पु. ईश्वरावर निष्ठा; आस्तिक्यबुद्धी; याच्या उलट अनीश्वरभाव. [सं.]

ईश्वरमाया–माव स्त्री. देवाने केलेला चमत्कार; देवाची लीला, कृत्य; देवाची करणी : 'आपण करूं जातां एक । प्रारब्ध घडवी अनेक । ईश्वरमायेचें कौतुक । ब्रह्मादिकां न कळेचि (अथवा नेणवेचि) ।'

ईश्वरवाद पु. (समाज.) जगात ईश्वराचे अस्तित्व आहे व सर्व घटना त्याच्याच इच्छेने, प्रेरणेने घडतात असे मानणारे तत्त्वज्ञान. [सं.]

ईश्वरविद्या स्त्री. (तत्त्व.) साक्षात्कारी मार्गाने ईश्वराचे, दैवी शक्तीचे अस्तित्व जाणून घेता येते असे प्रतिपादन करणारी तत्त्वप्रणाली.[सं.]

ईश्वरशास्त्र न. (तत्त्व.) १. 'थिऑलॉजिया' या मूळ ग्रीक शब्दाचा अर्थ ईश्वराविषयी (थिऑस) प्रवचन (लॉजिया) असा आहे. २. ईश्वराचे अस्तित्व व स्वरूप यांचा अभ्यास करणारे शास्त्र; धर्मशास्त्र. [सं.]

ईश्वरशास्त्रवेत्ता पु. ईश्वराचे अस्तित्व व त्या संबंधीचे शास्त्र जाणणारा.

ईश्वरसत्ता स्त्री. कोणत्याही बऱ्यावाईट घटनांमागे असणारी देवाची नियामक सत्ता; ईश्वरी सामर्थ्य. [सं.]

ईश्वरसाक्षात्कार पु. परमेश्वराचे दर्शन; देवाच्या अस्तित्वासंबंधी दृष्टांत.

ईश्वरसूत्र न. १. ईश्वरी योजना; ईश्वरी घटना; योगायोग; प्रारब्ध; दैव; नशीब. २. वधूवरांचा परस्पर विवाहसंबंध होण्यास कारणीभूत असलेला ईश्वरी संकल्प. [सं.]

ईश्वराचा (घरचा) प्राणी पु. देवानेच सांभाळलेला प्राणी; जिवंत प्राणी; असहाय मनुष्य; ज्यास कोणी आप्त मित्र नाही असा मनुष्य. (एखाद्याविषयी दया किंवा कीव दाखवताना वापरतात.).

ईश्वराचा लाल पु. देवाच्या मर्जीतला माणूस. ज्याची अतिशय भरभराट होत आहे असा माणूस; हरीचा लाल.

ईश्वरार्पण न. परमेश्वराला अर्पण करणे; देवाला वाहिलेली वस्तू.

ईश्वरावतार पु. १. देवाचा अवतार; मानवदेहधारी ईश्वर. २. (ल.) ज्यामध्ये दैवी गुण आहेत असा मनुष्य; पुण्यशील, उदार पुरुष.[सं.]

ईश्वरी स्त्री. शक्ती; दुर्गा; लक्ष्मी; सरस्वती; आदिमाया इ. देवता. वि. १. ईश्वरासंबंधीचा; ईश्वराने दिलेला. २. अतिशय भव्य, उदात्त, विपुल, अद्वितीय वगैरे अर्थीही वापरतात. जसे– ईश्वरी कोप, ईश्वरी आनंद, ईश्वरी प्रसाद, ईश्वरी बल, लाभ, सोहळा, संकेत इ. [सं.]

ईश्वरी आनंद पु. १. परमेश्वरस्वरूपात मानलेला आनंद, सुख. ईश्वराच्या ठिकाणी वाटणारा आनंद. २. परमेश्वरापासून मिळणारे सुख. ३. अत्यंत सुख; दैवी सुख; ब्रह्मानंद.

ईश्वरी उत्पात पु. दैवी आपत्ती, चमत्कार; भयंकर स्वरूपाचा सृष्ट चमत्कार (वीज, धूमकेतू, भूकंप इ.). [सं.]

ईश्वरी ऋणानुबंध पु. परमेश्वरी, दैवी घटना; ईश्वरी नेमानेम; विधिघटना; यदृच्छेने जुळलेले स्नेहसंबंध. [सं.]

ईश्वरी करणी–कृत्य स्त्री. न. परमेश्वरी लीला; ईश्वरकृत गोष्टी.

ईश्वरी कळा स्त्री. ईश्वरी लीला; परमेश्वरी कृत्य; देवाचे कौशल्य.

ईश्वरी कौतुक न. ईश्वरी लीला; ईश्वराने घडवून आणलेला चमत्कार; परमेश्वराची सृष्टिरचना, नियमन व प्रारब्धाधीन गोष्टी यांना हा शब्द योजतात.

ईश्वरी गादी स्त्री. न्यायासन; धर्मासन.

ईश्वरी चेष्टा स्त्री. परमेश्वरी कृत्य, खेळ; ईश्वरी लीला, कला.

ईश्वरी जीव–प्राणी पु. १. सृष्टीतील प्राणी. २. योगी; तापसी.

ईश्वरी तंत्र न. ईश्वरी घटना, योजना, कार्य, पद्धती; सृष्टिव्यापार चालण्यासाठी ईश्वराने करून ठेवलेली योजना.

ईश्वरी तेज सत्यशील माणसाचे तेज; सात्त्विक माणसाच्या ठिकाणी दिसून येणारी कांती, प्रभा.

ईश्वरी देणे– देणगी न. १. ईश्वराने दिलेली देणगी; प्रसाद. २. जन्मजात गुण; दैवी गोष्ट, देन.

ईश्वरी नाश पु. १. महाप्रलय; जगाच्या शेवटी होणारा मोठा प्रलय. २. (ल.) महासंकट; अरिष्ट; अनर्थ; दैवी आपत्ती.

ईश्वरी नियम– नेम– नेमानेम पु. दैवी घटना; ब्रह्मलिखित; सृष्टिनियम.

ईश्वरी न्याय पु. देवाच्या घरचा न्याय; खरा, वास्तविक न्याय.

ईश्वरी पसारा पु. ईश्वरनिर्मित सृष्टी, जग; जगदुत्पत्ती.

ईश्वरी पुरुष पु. १. साधू; वैराग्याशील, पुण्यपुरुष. २. भोळा, सरळ वृत्तीचा माणूस.

ईश्वरी प्रसाद पु. ईश्वराचा प्रसाद; देवाची कृपा.

ईश्वरी फळ १. देवाने दिलेली वस्तू; देवाची देणगी. २. पुत्र.

ईश्वरी बल, बळ न. अचाट शक्ती; असाधारण बळ; ईश्वरी पराक्रम; अलौकिक, अतिमानवी सामर्थ्य.

ईश्वरी भावना स्त्री. सत्प्रवृत्ती; पुण्यशीलता; साधुवृत्ती; परमार्थनिष्ठा.

ईश्वरी महिमा पु. ईश्वराचे सामर्थ्य, श्रेष्ठत्व, थोरवी; लीला, माहात्म्य.

ईश्वरी माया स्त्री. पहा : **ईश्वरमाया**

ईश्वरी मुद्रा स्त्री. दैवी मुद्रा, अत्यंत सतेज; तेज:पुंज अशी चर्या.

ईश्वरी यंत्र न. १. सर्व सृष्टी. पहा : **ईश्वरी तंत्र.** २. प्राणी, जीव, वनस्पती वगैरे ईश्वरनिर्मित वस्तुजात.

ईश्वरी लाभ पु. अकल्पितपणे झालेली अत्यंत मोठी प्राप्ती.

ईश्वरी लाल पु. पहा : **ईश्वराचा लाल**

ईश्वरी लीला स्त्री. ईश्वरी कृती, खेळ; परमेश्वरी कृत्य.

ईश्वरी वाचा स्त्री. देववाणी; आकाशवाणी, साक्षात्कार वगैरे स्वरूपाने किंवा एखाद्या महात्म्याच्या मुखातून प्रकट होणारी वाणी; ज्ञान.

ईश्वरी संकल्प, संकेत पु. विधिघटना; नेमानेम; प्रारब्ध.

ईश्वरी साक्षात्कार पु. देवाचे प्रत्यक्ष दर्शन; देवाने दाखविलेला चमत्कार; दृष्टांत. पहा : **ईश्वर साक्षात्कार**

ईश्वरी सूत्र पहा : **ईश्वरसूत्र**

ईश्वरी सोहळा पु. १. अत्यंत थाटाचा, शोभायुक्त उत्सव, आनंददायी प्रसंग (समाराधना, खेळ, मिरवणूक वगैरे). २. देवाप्रीत्यर्थ केलेला उत्सव, समारंभ ३. परमेश्वराच्या या सृष्टीतील घडामोडी, माणसाच्या आयुष्यातील घटना वगैरेंच्या चिंतनाने वाटणारा आनंद.

ईश्वरी क्षोभ पु. १. दैवी आपत्ती, अरिष्ट. २. दैवी कोप.

ईश्वरेच्छा, ईश्वरी इच्छा स्त्री. ईश्वरसत्ता; देवाची मर्जी.

ईषण न. इच्छा; अभिलाषा : 'ईषणत्रयाचा त्यागः'– उगी १११.[सं. इष्]

ईषणा स्त्री. इच्छा; प्रेम; उत्सुकता; काळजी; आस्था; आसक्ती. सामा. शब्द–लोकेषणा; पुत्रेषणा; वित्तेषणा; दारेषणा. [सं. इष्]

ईषत क्रिवि. अंशत; थोडेसे; किंचित : 'तरी अधिक नोहे ईषत् । मर्यादा न संडी ।' – ज्ञा २.३५८. सामा. शब्द– ईषदुष्ण, ईषदारुण, ईषद्दर्शन, ईषन्मात्र; ईषत्कर. [सं.]

ईषा स्त्री. दांडा (गाडीचा, नांगराचा); इशाड; धुरा : 'चढला होता धांवुनि ईषेवरि नग्न करुनि तरवारी ।'– मोद्रोण ११.५०. [सं.]

ईषिका स्त्री. कुंचली; ब्रश : 'चित्रकाराची जशी ईषिका तशी वार्णिका कवीची ।।'– टिक १२२. [सं.]

ईस उद्गा. इश्श ! ; छी. !; शी : ! ; पहा : **इश्श**

स्त्री. न. तिरस्कार; विषाद; नापसंती. (वा.) **ईस म्हणणे**– १. तिटकारा, कंटाळा, नापसंती दाखवणे : 'ईस देखील म्हटली नाही.' २. एकदम दुःख वाटून 'हाय' असे विव्हळणे.

ईसा पु. येशू ख्रिस्त.

ईसा स्त्री. ईर्षा : 'मारीन आपुलिया ईसा ।'– उषा १०.८०.[सं. ईर्ष्या]

ईसायन वि. ईशान्य दिशेतील : 'त्यांसि ईसायन कोणी मेलिकारु'– उषा १०.२१.

ईस्टर पु. गुडफ्रायडेनंतर पहिल्याच रविवारी ख्रिस्तपुनरुत्थापने निमित्त होणारा वार्षिकोत्सव; एक ख्रिस्ती सण. [इं.]

ईहा स्त्री. १. तीव्र इच्छा. २. हाती घेतलेले काम; उद्योग; व्यापार : 'या नांव काम जाण । कामक्रिया ते ईहा पूर्ण ।'–एभा २५.७. २. (मानस.) जाणीवपूर्वक व सहेतुक कृती करण्याची शक्ती; नियंत्रण ठेवण्याची, निवड करण्याची मनाची शक्ती; इच्छाशक्ती. [सं.]

ईहित वि. इच्छिलेले. [सं.]

ईळभर क्रिवि. दिवसभर; दीर्घकाल; पुष्कळ वेळ : 'ईळभराच्या कामानं ती मेटाकुटीला आली होती.'– ऊन ७३. (व.)

ईक्षण न. १. अवलोकन; पाहणे. २. डोळा; नयन : 'देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ।।'– ज्ञा १.१५. [सं. ईक्ष्]

ईक्षणयंत्र न. एक प्रकारचा आरसा. यात काचेऐवजी धातूचा पत्रा असून त्यावरून किरणांचे योग्य तऱ्हेने पृथक्करण होण्याकरिता तो घासून चांगला चकचकीत केलेला असतो. याचा उपयोग शस्त्रक्रियेच्या वेळी आंतरेंद्रिये पाहण्यास तसेच परावर्तक दुर्बिणीत करतात. [सं.]

ईक्षणे सक्रि. पाहणे; बघणे : 'ईक्षोनि शिष्यांचा मेळा दयाळु ।' – दावि २२२. [सं. ईक्ष्.]

ईक्षित वि. पाहिलेले; अवलोकन केलेले.